नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १६६ * ✻ अकोला ✻ शुक्रवार, दिनांक १९ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## सेवानिवृत्तीपूर्वी घाईघाईने निर्णय देणे दुर्दैवी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :
सर्वोच्च न्यायालयाने न्यायपालिकेत भ्रष्ट आचरणाबाबत अप्रत्यक्षपणे महत्त्वपूर्ण टिप्पणी केली. न्यायालयाने भ्रष्टाचाराचा उल्लेख न करता म्हटले की, निवृत्तीच्या अगदी आधी न्यायाधीशांनी बाह्य कारणांमुळे प्रभावित होऊन घाईघाईने निर्णय देणे दुर्दैवी आहे.
भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि विपुल एम पंचोली यांच्या खंडपीठाने म्हटले- काही न्यायाधीशांमध्ये निवृत्तीच्या काही दिवसांपूर्वी खूप जास्त आदेश पारित करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ते असे आदेश देतात जणू काही सामन्याच्या शेवटच्या षटकात षटकार मारत आहेत.

अग्राग्रलेख
## खरीखरी..
# शिल्पसम्राट गेले

आज शंभर वर्षांच्या शिल्प सम्राटाला आपण मुकलो आहोत. शिल्पकलोपासक राम सुतार शंभर वर्षांचे परिपूर्ण आयुष्य जगून त्यांच्या पुतळ्यांच्या रूपाने केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात अजरामर झाल्याचे म्हणता येईल. हाताची पाच बोटे आणि छिन्नी व हातोडी यांच्या मिलाफाने दगडांनाही जिवंतपणा आणणारा महान शिल्पकार म्हणून शिल्पकलेच्या इतिहासातील हा मैलाचा दगड जगाला रामराम करून स्वर्गगामी झाला. जगातील सर्वात मोठी शिल्पकृती बडोदा येथील सरदार वल्लभभाई पटेल यांची आहे त्याला जगभरात स्टॅच्यू ऑफ युनिटी या नावाने ओळखले जाते, ती शिल्पकृती निर्माण करणारे राम सुतार होते. संसद भवनाच्या आवारात मौलाना अब्दुल कलाम आझाद, इंदिरा गांधी, राजीव गांधी, गोविंद वल्लभ पंत, जगजीवन राम, या सर्व शिल्पकृती त्यांच्या नावावर आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस अशा अनेक दिग्गज नेत्यांच्या दगडी मूर्ती साक्षात जिवंत वाटाव्यात इतक्या बोलक्या आहेत. राम सुतार भारतीय होते महाराष्ट्राचे होते, अशा या मराठमोळ्या शिल्पोपासकाने फ्रान्स, इटली, अर्जेंटिना, रशिया, इंग्लंड यासारख्या अनेक देशात साकारलेली शिल्पे आपल्या जिवंतपणाचा अनुभव देत दिमाखाने उभी आहेत. जीवनातील प्रसंगांचे दर्शन घडवणारी त्यांची भित्तिशिल्पे अगदी हुबेहूब वाटतात. राम सुतार शंभर वर्षांपूर्वी धुळे जिल्ह्यात जन्माला आले, त्यांना अनेक सन्मान आणि पुरस्कार लाभले. पद्मश्री, पद्मभूषण आणि नुकताच महाराष्ट्र भूषण त्यांना सन्मानाने देण्यात आला असे हे थोर व्यक्तिमत्व होते. त्यांनी निर्मिलेल्या प्रत्येक शिल्पात जणू काही जीवच ओतला आहे असे वाटायचे. सुतार यांचे कला विश्वातील योगदान कोणालाही नाकारता येणार नाही. शंभर वर्ष पूर्ण केल्यावरही शिल्पकलेतील या रामराजाला अजूनही काही काळ आयुष्य लाभावे असे प्रत्येकालाच वाटत होते. महात्मा गांधीजींचे साडेतीनशे पेक्षा जास्त पुतळे त्यांनी तयार केले. त्यांच्या जन्मस्थळा जवळील जगप्रसिद्ध अजिंठा-वेरूळ लेण्यांमधील शिल्पांच्या जीर्णोद्धारात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. आम्ही वर उल्लेख केलेल्या गुजरात मधील सरदार पटेल यांचा १८२ मीटर उंचीचा पुतळा आश्चर्यकारकच आहे नव्हे, तर ते जगातील नवीन आश्चर्य म्हणून गणले जावे इतका अप्रतिम आहे. हे शिल्प रामराजे ३५ वर्षापासून नोएडा येथे निवासासाठी होते, तिथेच त्यांचा स्टुडिओ आहे. त्यांनी तयार केलेले अनेक पुतळे जगभरातील विविध देशांना दान करण्यात आलेले आहेत. अयोध्येतील लता मंगेशकर चौकात बसवलेली प्रचंड मोठी मूर्ती आणि वीणा यांची निर्मिती करणारे, बंगळुरू येथील १५३ फूट उंच भगवान शिवाच्या मूर्तीची निर्मिती करणारे, मोशी पुणे येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा १०० फूट उंचीचा पुतळा उभारणारे आणि पटना येथील गांधी मैदानावर दोन मुलांसह गांधीजींचा पुतळा साकारणारे राम सुतार निश्चितच भारताला ललामभूत आहेत असे म्हटले तर ते अजिबात वावगे ठरणार नाही. शंभर वर्षाचे आयुष्य म्हणजे सामान्य माणसाचे परिपूर्ण आयुष्य म्हटले जाते. या परिपूर्ण आयुष्याचा परिपूर्ण उपयोग करून आपल्या जीवनाला या शिल्पकला सम्राट रामभाऊंनी अक्षरशा सार्थक केले. राम सुतार फक्त व्यक्ती नव्हते तर एक संस्थाच होते, त्यासोबतच राम सुतार हे एक विद्यापीठ होते. त्यांनी आपल्या विद्यापीठात अनेकांना शिकवले, त्यांचे शिष्य आज आपल्या गुरुच्या अकाली म्हणता येत नसले, तरी अकाली वाटणाऱ्या निधनामुळे पोरके झालेले आहेत. आयुष्यभर शिल्पकलेची उपासना करणारा आणि शिल्पातच देव शोधणारा, शिल्पातून देव आणि दैव निर्माण करणारा, आपल्या शिल्पातून कलात्मकतेची हिमालयाएवढी उंची गाठणारा आणि शंभर वषानंतरही म्हातारा न वाटणाऱ्या म्हणजेच चीरतरुण अशा या शिल्पकाराला आज अवघे जग दुखाने शेवटचा प्रणिपात करीत आहे. खरेतर राम सुतार एक होता की अनेक होते असा प्रश्नही निर्माण होऊ शकतो. भारतातील या महान कलावंताला बहुधा स्वर्गात शिल्पे बनवण्यासाठी पाचारण करण्यात आले असावे. तेथे आता त्यांनी ज्या ज्या महान आणि दिग्गज नेत्यांचे शिल्प साकारलेले आहे ते सर्व महान नेते एकाच वेळी त्यांचे प्रेमाने स्वागत करतील आणि त्यांना मरणोपरांत जिवंत ठेवणाऱ्या या सम्राटाला प्रेमाने आलिंगन देतील यात शंका नाही. अशा या आपल्या शिल्पसम्राट रामभाऊंना विनम्र श्रद्धांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# कोकाटेंचा अखेर राजीनामा!
# कोणत्याही क्षणी अटक



● शासकीय सदनिकेच्या गैरवापरप्रकरणी नाशिक न्यायालयाने दोषी ठरवल्यानंतर राज्याचे मंत्री माणिकराव कोकाटे यांनी अखेर आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. या राजीनाम्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून मंत्रिमंडळातील रिक्त जागेवर कोणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

न्यायालयाच्या निर्णयानंतर कोकाटेंवर चौफेर टीका होत होती. विरोधकांनी तात्काळ राजीनाम्याची मागणी केली होती. अखेर नैतिक जबाबदारी स्वीकारत कोकाटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपला राजीनामा सादर केला असून तो स्वीकारण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

कोकाटेंचा राजीनामा झाल्यानंतर महायुती सरकारमध्ये तातडीने हालचाली सुरू झाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कोट्यातील हे मंत्रिपद रिक्त झाल्याने, नव्या मंत्र्याच्या निवडीवर चर्चा सुरू झाली आहे. अजित पवार लवकरच या जागेसंदर्भात मोठा निर्णय घेणार असल्याची माहिती आहे.

या रिक्त मंत्रिपदासाठी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. मात्र, त्यांच्यावरील वादग्रस्त आरोप आणि सुरू असलेले प्रकरण लक्षात घेता सरकार कोणताही धोका पत्करणार नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे स्वच्छ प्रतिमेचा आणि वादातीत चेहरा देण्याचा विचार अजित पवार गट करत असल्याचे संकेत मिळत आहेत.

### राजीनामा कारवाईसाठी सीएम कडे नाशिक पोलिस मुंबईत

अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते व माजी क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून त्यांचे खाते बुधवारी काढून टाकण्यात आले होते. त्यानंतर आता आज उपमुख्यमंत्री अजित पवारांनी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारला असून त्यांनी हा राजीनामा पुढे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठवला आहे. तर दुसरीकडे नाशिक पोलिस कोकाटेंना अटक करण्यासाठी मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सदस्य व पक्षातील आमचे सहकारी माणिकराव कोकाटे यांनी आपला राजीनामा माझ्याकडे सुपूर्द केला आहे. कायदे-नियम हे सर्वोच्च स्थानी असून आमच्या पक्षाच्या भूमिकेनुसार हा राजीनामा तत्वतः स्वीकारण्यात आल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

## व्हीबी-जी राम जी' विधेयक लोकसभेत पास

### विरोधकांनी कागद फाडून फेकले

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १८ :
लोकसभेत कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी भारत गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन (ग्रामीण) बिल, ज्याला व्हीबी-जी राम जी म्हणूनही ओळखले जाते, त्यावर प्रतिक्रिया दिली. यादरम्यान, विरोधकांनी विधेयकाविरुद्ध घोषणाबाजी केली. विरोधी पक्षाच्या खासदारांनी विहिरीत गर्दी केली आणि कागदपत्रे फेकली.

शिवराज सिंह चौहान म्हणाले, मनरेगा हे मूलतः महात्मा गांधींच्या नावावर नव्हते. ते मूलतः नरेगा होते. नंतर, २००९च्या निवडणुका आल्या तेव्हा निवडणुका आणि मतांसाठी महात्मा गांधींची आठवण आली. बापूंची आठवण आली. त्यानंतर त्यात महात्मा गांधींचा समावेश करण्यात आला.

यानंतर, सभागृहाने व्हीबी-जी राम जी विधेयक आवाजी मतदानाने मंजूर केले. त्याआधी, विरोधकांनी संसद संकुलात निषेध मोर्चा काढला. ५० हून अधिक विरोधी खासदारांनी निषेध मोर्चात भाग घेतला आणि व्हीबी-जी राम जी विधेयक मागे घेण्याची मागणी करत घोषणाबाजी केली.

बुधवारी, लोकसभेत व्हीबी-जी राम जी विधेयकावर १४ तास चर्चा झाली. कामकाज पहाटे १:३५ वाजेपर्यंत चालले. ९८ खासदारांनी चर्चेत भाग घेतला. २० वर्षे जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेणारा प्रस्तावित कायदा स्थायी समितीकडे पाठवावा अशी विरोधकांची मागणी होती

## शिवसेना-भाजपचे १५० जागांवर एकमत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१८ :
मुंबई महानगरपालिकेसाठी शिवसेना शिंदे गट आणि भाजप या दोन पक्षात जागावाटपावरून आज दुसरी बैठक पार पडली. या बैठकीत दोन्ही पक्षांकडून १५० जागांवर एकमत झाल्याचे भाजप नेते अमित साटम यांनी पत्रकार परिषद घेत स्पष्ट केले आहे.

उर्वरित ७७ जागांवर लवकरच चर्चा होणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले. तसेच मुंबई महापालिकेसाठी जागावाटपाचा देखील फॉर्म्युला अमित साटम यांनी यावेळी सांगितला. मुंबई महापालिकेला विकून खाणाऱ्यांना घरी बसवण्यासाठी महायुती सज्ज असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.

## स्कॉर्पिओ दरीत कोसळली ३ महिलांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था,नैनीताल,दि. १८ :
उत्तराखंडमधील नैनितालमध्ये गुरुवारी पर्यटकांनी भरलेली यूपी नंबरची स्कॉर्पिओ २०० फूट खोल दरीत कोसळली. यात गाडीतील युवकाची आई, पत्नी आणि मेहुणीचा मृत्यू झाला आहे. तर कारमधील इतर ६ जण गंभीर जखमी झाले.

भवाली पोलिसांनी तिन्ही महिलांच्या मृत्यूची पुष्टी करत सांगितले की, हा अपघात भवाली-अल्मोडा राष्ट्रीय महामार्गावर सकाळी झाला. चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात झाला. अपघातानंतर वाटसरूंनी पोलिसांना अपघाताची माहिती दिली, त्यानंतर पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी स्थानिक लोकांच्या मदतीने गाडीत अडकलेल्या लोकांना बाहेर काढले.

## मुंबई हायकोर्टासह नागपूर, वांद्रे कोर्ट 'बॉम्ब'ने उडवण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि.१८ :
मुंबईतील उच्च न्यायालयासह वांद्रे, किल्ला कोर्ट आणि राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरच्या जिल्हा न्यायालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी आज गुरुवार दिनांक १८ डिसेंबर रोजी देण्यात आली.

या धमकीमुळे संपूर्ण राज्यात एकच खळबळ उडाली आहे. एका ई-मेलद्वारे ही धमकी देण्यात आल्याने पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांची धावपळ उडाली असून, तातडीने न्यायालये रिकामी करून बॉम्बशोधक पथकाद्वारे कसून तपासणी सुरू करण्यात आली आहे.

माहितीनुसार, मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत वेबसाईटवर एक धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. यात केवळ उच्च न्यायालयच नव्हे, तर 'मुंबईतील सर्व न्यायालये बॉम्बने उडवून देऊ', असा मजकूर होता.
यात प्रामुख्याने वांद्रे आणि किल्ला कोटार्चाही उल्लेख असल्याचे समजते. ही माहिती मिळताच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, उच्च न्यायालयाची इमारत रिकामी केली. तसेच वांद्रे न्यायालयातही कामकाज स्थगित करून वकील, कर्मचारी आणि पक्षकारांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.

## स्टॅच्यू ऑफ युनिटीचे शिल्पकार शांत
# पद्मश्री राम सुतार यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि.१८ :
आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय शिल्पकलेचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ शिल्पकार पद्मश्री राम सुतार यांचे बुधवारी रात्री निधन झाले. नोएडा येथील त्यांच्या निवासस्थानी रात्री सुमारे १.३० वाजता त्यांनी वयाच्या १०१ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. दीर्घायुष्य लाभलेले राम सुतार हे अखेरपर्यंत सृजनशीलतेशी नाते जपणारे व्यक्तिमत्त्व होते.





भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये उभारलेल्या त्यांच्या भव्य शिल्पकृतींनी भारतीय शिल्पपरंपरेला जागतिक ओळख मिळवून दिली. स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक राष्ट्रीय नेत्यांची स्मारके, तसेच एकता आणि प्रेरणेचे प्रतीक ठरलेले पुतळे ही त्यांची अमूल्य देणगी मानली जाते. त्यांच्या निधनामुळे भारतीय कला, संस्कृती आणि शिल्पकलेच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आज सकाळी ११ वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असून, कला क्षेत्रातून तसेच विविध स्तरांतून त्यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे.

जगभरात २०० हून अधिक शिल्पांची निर्मिती करणारे राम सुतार हे नाव केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही आदराने घेतले जात होते. दिल्लीतील संसद भवन परिसरात उभारलेली त्यांची शिल्पे आजही भारतीय लोकशाहीची साक्ष देतात.

राम सुतार यांना त्यांच्या योगदानाबद्दल पद्मश्री, पद्मभूषण तसेच महाराष्ट्र भूषण या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारकडून त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः रुग्णालयात जाऊन हा पुरस्कार त्यांच्या हाती सोपवला होता.

अलीकडेच अंदमान येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले होते, तो पुतळादेखील राम सुतार यांच्या कलाकृतीचा भाग होता. त्यांच्या शिल्पांमधील सूक्ष्म बारकावे आणि वास्तववादी मांडणी ही त्यांच्या कलेची ओळख होती.

## मानव-वन्यजीव संघर्ष आता राज्यसभेत

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :
महाराष्ट्रामध्ये मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष आता अत्यंत गंभीर वळणावर पोहोचला आहे. वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या शेतीच्या नुकसानीचा आकडा वर्षाकाठी १० हजार कोटी रुपयांच्या पुढे गेला असून, जीवितहानीचे प्रमाणही वाढले आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी आज राज्यसभेत यावर ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली. त्यांनी राज्याच्या ग्रामीण भागातील भयावह परिस्थितीकडे केंद्राचे लक्ष वेधले.



प्रा. डॉ. कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२३-२४ या वर्षात वन्यप्राण्यांनी केलेल्या नुकसानीच्या तब्बल ४० हजार तक्रारींची नोंद झाली. रानगवे, नीलगायी, रानडुक्कर आणि माकडांमुळे पिकांचे नुकसान होत आहे. नुकसानभरपाई शेतकऱ्यांच्या कष्टाच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या वर्षभरात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ५० हून अधिक नागरिकांना आपला जीव गमवावा लागल्याचे त्यांनी सांगितले.

## जागतिक कीर्तीचा कलाकार गेला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१८ :
ज्येष्ठ शिल्पकार महाराष्ट्रभूषण, डॉ. राम सुतार यांच्या निधनावर अनेक मान्यवरांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

डॉ. राम सुतार यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांचे पुत्र अनिल सुतार यांना दूरध्वनी करून शोकसंवेदना व्यक्त केल्या आणि त्यांना सांत्वना दिली. रामभाऊंच्या निधनाने जिवंत मूर्ती साकारणारा जागतिक कीर्तीचा एक उमदा कलाकार आपल्यातून निघून गेला, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली.

अनेक शिल्पांना त्यांनी आकार दिला. स्टॅच्यु ऑफ यूनिटीमधील सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा किंवा अंदमानमधील वीर सावरकर यांचा पुतळा. वयाच्या १०० व्या वर्षी सुद्धा ते इंदू मिल येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामात गुंतले होते. संसद भवन परिसरात सुद्धा त्यांनी तयार केलेले अनेक पुतळे आहेत. आपले आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले, आपले वारकरी संत अशा मोठ्या मांदियाळीच्या शिल्पांना आकार देण्याचे काम त्यांनी केले. या शिल्पांच्या माध्यमातून त्यांची कला शतकानुशतके आपल्या स्मरणात राहील, असे फडणवीस म्हणाले.

दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय कीतीर्चे ज्येष्ठ शिल्पकार महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्या निधनाने शिल्पकलेच्या क्षेत्रातील एक महान पर्व आणि 'शिल्पकलेचा कोहिनूर' काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या.

# वाळू माफियांचा पोलिसांवर हल्ला
## बचावासाठी उपनिरीक्षकांकडून गोळीबार : दोघे जखमी

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि.१८ :
महागाव तालुक्यातील वाडी (वाकोडी) परिसर आज गुरुवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास वाळू तस्करांच्या झुंडशाहीने हादरला.



वाळू तस्करी रोखण्यासाठी गेलेल्या महागाव पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक व एका शिपायावर तस्करांनी हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. बचावासाठी पोलीस उप निरीक्षकांनी हवेत गोळीबार केला. यात उपनिरीक्षकांसह एक वाळू तस्कर जखमी झाले. सुनील अंबुरे, असे जखमी उपनिरीक्षकांचे नाव आहे.

पुस नदीपात्रातून वाळूची मोठी तस्करी होत असल्याची माहिती मिळताच पोलीस उप निरीक्षक सुनील अंबुरे एका शिपायाला घेऊन दुचाकीने वाडी गावी पोहोचले. भर चौकात ट्रॅक्टरने वाळू चोरी सुरू होती. पोलिसांनी अडवण्याचा प्रयत्न करताच सहा वाळू तस्करांनी अंबुरे यांना घेरले. सिमेंटच्या विटा आणि दगडांनी त्यांना अमानुष मारहाण सुरू केली. परिस्थिती इतकी गंभीर होती की, अंबुरे यांना जागीच संपवण्याचा तस्करांचा डाव होता.

जीवावर बेतल्याचे लक्षात येताच अंबुरे यांनी आपली रिवॉल्वर काढली आणि दोन राऊंड फायर केले. पहिली गोळी एका तस्कराच्या खांद्याला लागली. झटापटीत तस्करांनी रिवॉल्वर हिसकावण्याचा प्रयत्न केला असता दुसरी गोळी सुटून थेट अंबुरे यांच्या डाव्या तळहातात घुसली. गोळीबाराच्या आवाजाने गावकरी धावून आले आणि माफिया पसार झाले.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली असून, मोरथ येथील स्मशानभूमीत लपून बसलेल्या तीन तस्करांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. तिघेजण अद्याप फरार आहेत. पोलीस उप निरीक्षक सुनील अंबुरे यांच्या हातावर आज रात्री पुसद येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.



## शिंदेंनी राजीनामा द्यावा!



■ **मुंबई :** सातारा जिल्ह्यातील सावरी गावात सापडलेला तब्बल ११५ कोटी रुपयांचा ४५ किलो ड्रग्ज साठा हा राज्यातील आतापर्यंतचा सर्वांत मोठा अमली पदार्थांचा साठा असल्याचा दावा शिवसेना (ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. या प्रकरणाचा थेट संबंध उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कुटुंबाशी जोडला जात असल्याने राजकीय वातावरण तापले आहे.

सुषमा अंधारे यांनी थेट आरोप करत म्हटले की, ज्या रिसॉर्टवर हा प्रचंड ड्रग्ज साठा सापडला, तो प्रकाश शिंदे यांच्या मालकीचा असून ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे भाऊ आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाचा तपास निष्पक्ष व्हावा, यासाठी एकनाथ शिंदे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली. रणजित शिंदे हे दरेगावचे सरपंच असून एकनाथ शिंदे यांचे मूळ गावही दरेगावच आहे, हेही अंधारे यांनी अधोरेखित केले. धनंजय मुंडे, पार्थ पवार यांच्यावर जसे नियम लावले गेले, तसेच नियम एकनाथ शिंदे यांनाही लावले जावेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदेंचा राजीनामा घ्यावा, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली.

## सनसनाटी करण्याचा प्रयत्न



■ **मुंबई :** एकनाथ शिंदे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी अंधारे यांनी केली. तसेच यावर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री शंभूराज देसाई यांनी सुषमा अंधारे यांच्या आरोपांवर पलटवार केला आहे.

देसाई म्हणाले, शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आमचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्यावर जे बेछूट आरोप केले आहेत, त्यावर मी कालच प्रतिक्रिया दिली होती. त्यावर आज पत्रकार परिषद घेऊन सुषमा अंधारे यांनी त्याच आरोपांचे रीपीटेशन केले आहे. केवळ राज्यात निवडणुका सुरू आहेत म्हणून या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सनसनाटी निर्माण करण्याचा हा एक केविलवाणा प्रयत्न अंधारे करत आहेत.

पुढे बोलताना शंभूराज देसाई म्हणाले, मागे सुद्धा दोन वर्षांपूर्वी जेव्हा एकदा नाशिकमध्ये ड्रग्स प्रकरण घडले होते, तेव्हा उत्पादन शुल्क मंत्री मी होतो आणि माझा थेट संबंध आहे अशा पद्धतीचे बेछूट आरोप त्यावेळी सुषमा अंधारे यांनी केले होते. ज्यावेळी मी या आरोपांच्या विरोधात जाहीरपणे सांगितले की तुमचे हे विधान ४८ तासांत मागे घ्या, माफी मागा नाहीतर कायदेशीर कारवाईला सामोरे जा आणि ही कायदेशीर कारवाई न्यायालयात सुरू असल्याची माहिती देसाई यांनी दिली आहे.

## गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी विशेष समिती



■ **मुंबई :** महाराष्ट्रातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांचे संवर्धन आणि तिथली अनधिकृत अतिक्रमणे हटवण्यासाठी महायुती सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. सांस्कृतिक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली असून, उद्यापासूनच यावर कारवाई सुरू होईल, अशी माहिती मंत्री नितेश राणे यांनी दिली.

राणे म्हणाले की, गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवताना अनेकदा जमाव जमवून अडथळा आणला जातो, काही ठिकाणी तर शस्त्रेही सापडली आहेत. मात्र, आता सरकार तडजोड करणार नाही. या समितीत छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदुत्वाच्या विचारांशी प्रामाणिक असणारे लोक आहेत, त्यामुळे ही कारवाई कडक असेल.

## जळगाव सराफ बाजारात चांदीचा ऐतिहासिक उच्चांक

■ **जळगाव :** सुवर्णनगरी म्हणून ओळखल्या जाणा?या जळगावच्या सराफ बाजारात आज चांदीने इतिहास घडवला आहे. चांदीच्या दराने आजवरचे सर्व उच्चांक मोडीत काढत पहिल्यांदाच दोन लाखांचा टप्पा ओलांडला असून, चांदीचा दर २ लाख ६ हजार रुपये (जीएसटीसह) इतका झाला आहे. सलग दुसऱ्या दिवशी चांदीच्या दरात मोठी उसळी पाहायला मिळाली असून, आज एकाच दिवसात १ हजार रुपयांची वाढ नोंदवण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, गेल्या अवघ्या दोन दिवसांत चांदी तब्बल ९ हजार रुपयांनी महागली आहे. त्यामुळे सराफ बाजारात प्रचंड खळबळ उडाली असून, खरेदीदार आणि व्यापारी दोघेही या दरवाढीकडे आश्चर्याने पाहत आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातील तेजी, वाढती औद्योगिक मागणी आणि देशांतर्गत मागणीत झालेली वाढ यामुळे चांदीच्या दरात ही झपाट्याने वाढ झाल्याचे सराफ तज्ज्ञांचे मत आहे. चांदीसोबतच सोन्याच्या दरातही आज किरकोळ वाढ नोंदवण्यात आली आहे. सोन्याचे दर आज २०० रुपयांनी वाढून १ लाख ३६ हजार २०० रुपये (जीएसटीसह) इतके झाले आहेत. मात्र, चांदीच्या तुलनेत सोन्याची वाढ मर्यादित राहिली आहे. लग्नसराईत दरवाढीचा फटका सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असून दरवाढीने ग्राहकांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे.

# भाजप पदाधिकाऱ्यांना शिंदेंसोबत युती नको

## पत्र लिहून व्यक्त केली नाराजी : काम न करण्याचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ :**
राज्यात महायुतीच्या माध्यमातून महापालिका निवडणुका लढवण्याची अधिकृत घोषणा झाली असली, तरी ठाणे शहरात भाजपमध्ये या निर्णयाविरोधात तीव्र असंतोष उफाळून आला आहे. आम्हाला युती नको, आम्ही स्वबळावरच निवडणूक लढवणार, अशी ठाम आणि आक्रमक भूमिका ठाण्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेतली आहे.

स्थानिक आमदार, जिल्हाध्यक्ष आणि शहर नेतृत्वाकडे थेट नाराजी व्यक्त करण्यात आली असून, यामुळे ठाण्यात महायुतीसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. महापालिका निवडणुकीच्या तोंडावरच भाजपमधील ही धुसफूस उघडपणे समोर आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

या नाराजीमागे मागील काही महिन्यांपासून सुरू असलेला भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यातील संघर्ष कारणीभूत ठरत आहे. दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे स्वबळावर लढा, हा नारा देत कार्यकर्त्यांना तयारीला लावले होते. अनेक प्रभागांमध्ये इच्छुक उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक केली, प्रचारयंत्रणा उभारली आणि स्थानिक पातळीवर बांधणी सुरू केली होती.

अशा परिस्थितीत अचानक युतीची घोषणा झाल्याने अनेक कार्यकर्त्यांची स्वप्ने भंग पावण्याची भीती आहे. युती झाल्यास जागा कमी मिळतील, उमेदवारीची संधी गमावली जाईल, ही भावना ठाण्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र झाली आहे.

या असंतोषाचे ठळक रूप म्हणजे ठाण्यातील १८ प्रांत अध्यक्षांनी एकत्र येत युती नको, असा ठाम संदेश देणारे पत्र जिल्हाध्यक्ष आणि स्थानिक आमदारांकडे सादर केले आहे. या पत्रात भाजपने स्वबळावर लढण्याची ताकद असल्याचा ठाम दावा करण्यात आला असून, युतीमुळे पक्षाचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

कार्यकर्त्यांनी मागील काळात केलेल्या संघर्षाची आठवण करून देत, आम्ही मेहनत घेतली, जनाधार वाढवला आणि आता संधी गमावायची नाही, अशी भूमिका पत्रातून मांडण्यात आली आहे. या पत्रामुळे भाजपच्या स्थानिक नेतृत्वावर दबाव वाढला असून, वरिष्ठ पातळीवरही ठाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**काम न करण्याचा इशारा**

दरम्यान, नाराज कार्यकर्त्यांनी आमदार संजय केळकर, आमदार



निरंजन डावखरे आणि शहराध्यक्ष संदीप लेले यांची भेट घेऊन लेखी निवेदने दिली आहेत. काही पदाधिकाऱ्यांनी तर युती झाल्यास काम न करण्याचा इशाराही दिला आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला संधी मिळावी आणि ठाण्यात भाजपची ओळख, ताकद आणि नेतृत्व टिकून राहावे, ही त्यांची मुख्य मागणी आहे.

यावर प्रतिक्रिया देताना जिल्हाध्यक्ष संदीप लेले यांनी सांगितले की, कार्यकर्त्यांची भावना स्पष्ट आहे आणि त्यांचा रोष आम्हाला समजतो. मात्र, अंतिम निर्णय वरिष्ठ नेत्यांचा असतो आणि तो मान्य करणे भाग आहे. तरीही नाराज पदाधिकाऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**कमी जागा मिळाल्यास असंतोष**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ठाण्यात प्रभाव असला, तरी भाजपनेही गेल्या काही वर्षांत शहरात मजबूत संघटन उभारले आहे. त्यामुळे जागावाटपात भाजपला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळाल्यास असंतोष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. भाजपचे वरिष्ठ नेते कोणता तोडगा काढतात, याकडे लक्ष लागले आहे.

### जागावाटपाचा' पेच

महाराष्ट्रात सध्या निवडणुकांचे वातावरण सुरू असून महापालिकेच्या निवडणुका देखील अगदी तोंडावर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिवसेना शिंदे गटात सध्या जागावाटपाची बोलणी सुरू आहे.

दोन्ही पक्षात जागावाटपावरून झालेल्या पहिल्या बैठकीत भाजपने शिवसेना शिंदे गटाला फक्त ५२ वॉर्ड देण्याची तयारी दर्शवली होती. परंतु, या प्रस्तावाला शिंदे गटाकडून नाकारण्यात आले. त्यानंतर आज पुन्हा एकदा दोन्ही पक्षात जागावाटपावरून दुसरी बैठक होत आहे. दरम्यान, या बैठकीपूर्वीच शिवसेना शिंदे गटाने मुंबईतील १२७ प्रभागांवर दावा केला आहे.

भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या आजच्या बैठकीत मुंबईतील प्रभागांच्या जागावाटपाबाबत लोकसभा विभागनिहाय चर्चा होणार असल्याची माहिती आहे. ही बैठक दादरच्या वसंतस्मृती कार्यालयात पार पडणार आहे. यावेळी प्रत्येक वॉर्डमधील राजकीय समीकरण, पक्षीय बलाबल आणि यापूर्वीच्या निवडणुकीत ही जागा कोणी लढवली होती, यावर सविस्तर चर्चा होणार आहे.

शिवसेनेची आधीपासूनच मुंबईत पकड असली तरी भाजपने देखील प्रत्येक प्रभागात आपली मोचेबांधणी करत ताकद वाढवली आहे. त्यानुसार भाजपने प्रत्येक वॉर्डनुसार नियोजन केले असून जास्तीत जास्त जागा जिंकून भाजपचा महापौर बसवण्यासाठी भाजप प्रयत्नशील असणार आहे.

दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे सध्याच्या घडीला मुंबईत आजी-माजी असे सगळे मिळून १२७ नगरसेवक आहेत. त्यामुळे शिवसेना शिंदे गटाने २०१७ च्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत धनुष्यबाणाच्या चिन्हावर लढवण्यात आलेल्या सर्वच जागांवर दावा केला आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गटाकडून अर्ध्याहून अधिक जागांवर दावा करण्यात आला आहे. यावर दोन्ही पक्ष काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

**भाजपचा विजयाचा फॉर्म्युला**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपने अत्यंत सूक्ष्म रणनीती आखली असून, २०१६ मध्ये जिंकलेल्या ८२ जागांवर आपला दावा कायम ठेवला आहे. याव्यतिरिक्त, ज्या प्रभागांमध्ये भाजपचे उमेदवार अल्प मतांनी पराभूत झाले किंवा जिथे भाजप उमेदवार आणि बंडखोरांची एकत्रित मते शिवसेनेच्या विजयी उमेदवारापेक्षा जास्त होती, त्या जागांवरही भाजपने हक्क सांगितला आहे. भाजपने मुंबईतील ८ विधानसभा मतदारसंघांमध्ये शिंदे गटाला एकही जागा सोडलेली नाही.

# धनंजय मुंडेंना डावलून दुसऱ्याचे नशीब फळफळणार?

## माणिकराव कोकाटेंच्या मंत्रिपदावर अजित पवारांचा गुप्त डाव

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. १८ :**
शासकीय सदनिकेच्या गैरवापरप्रकरणी नाशिक न्यायालयाने मंत्री माणिकराव कोकाटे यांना शिक्षा सुनावल्यानंतर राज्याच्या राजकारणात भूकंपच झाला आहे. कोकाटेंचे मंत्रिपद जाणे आता जवळपास निश्चित मानले जात असताना, त्यांच्या जागी नेमकं कोण? हा प्रश्न सध्या सत्ताकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे.



सुरुवातीला या शर्यतीत धनंजय मुंडे यांचे नाव आघाडीवर असल्याचे चित्र होते. मात्र जसजसे राजकीय गणित उलगडू लागले, तसतसे चित्र बदलत गेले आणि आता बीड जिल्ह्यातीलच एका वेगळ्या नेत्याचे पारडे जड होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. अजित पवार लवकरच मोठा निर्णय घेणार असल्याचे संकेत मिळत असून, मंत्रिमंडळ विस्तारात सरप्राइज मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**मुंडेंसमोरील अडथळ्यांची भिंत**

धनंजय मुंडे पुन्हा मंत्रिमंडळात येण्यासाठी सक्रिय हालचाली करत असल्याची जोरदार चर्चा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची घेतलेली भेटही याच पार्श्वभूमीवर पाहिली जात आहे. मात्र, त्यांच्या वाटेतील अडथळे सध्या दुर्लक्ष करण्यासारखे राहिलेले नाहीत.

संतोष देशमुख खून प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड हा मुंडेंचा निकटवर्तीय मानला जातो. या प्रकरणाचा तपास सुरू असताना आणि निकाल प्रलंबित असताना मुंडेंना मंत्रिपद देणे सरकारसाठी डोकेदुखी ठरू शकते.

अजित पवार गट सध्या कोणताही नवा वाद अंगावर घेण्याच्या मानसिकतेत नाही. स्वच्छ, वादातीत चेहरा देण्यावर भर दिला जात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

**अजित पवारांचे ट्रम्प कार्ड : विजयसिंह पंडित**

याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांचे नाव अचानक चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. कोकाटेंच्या रिक्त झालेल्या मंत्रिपदासाठी त्यांचीच वर्णी लागणार, अशी जोरदार राजकीय चर्चा सुरू आहे.

ज्येष्ठ नेते शिवाजीराव पंडित यांचे सुपुत्र आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे बंधू असलेले विजयसिंह पंडित हे पवार कुटुंबाचे अत्यंत विश्वासू मानले जातात. राष्ट्रवादीतील फूटीनंतर त्यांनी क्षणाचाही विलंब न करता अजित पवारांची बाजू घेतली.

अजित पवार गटाचा बीडमधील राजकीय कारभार पंडितांच्या शिवछत्र या निवासस्थानातून चालतो, असे उघडपणे बोलले जाते. त्यामुळे जिल्ह्यातील संघटनात्मक ताकद त्यांच्या हातात आहे. वादग्रस्त मुद्द्यांपासून दूर असलेले विजयसिंह पंडित हे धनंजय मुंडेंच्या तुलनेत सरकारसाठी अधिक सेफ ऑप्शन मानले जात आहेत.

### सुप्रिया सुळे आक्रमक



दरम्यान, धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्रिमंडळात घेण्याच्या चर्चेमुळे शरद पवार गट चांगलाच आक्रमक झाला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे. ज्यांच्यावर गंभीर आरोप झाले, अशा धनंजय मुंडेंना गृहमंत्री अमित शाह भेट कशी देतात? हे पाहून मला वाईट वाटते, असा थेट सवाल सुळे यांनी उपस्थित केला.

जर आरोपांमध्ये तथ्य नव्हते, तर त्यांचा राजीनामा का घेतला गेला? असा प्रश्न करत, मुंडेंना मंत्रिपद दिल्यास बीडमध्ये उपोषण आणि राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशाराच त्यांनी दिला आहे.

**राजकीय घड्याळाची टिक-टिक सुरू**

कोकाटेंच्या मंत्रिपदावर आता शिक्कामोर्तब होणे केवळ औपचारिकता उरली असताना, अजित पवार नेमका कोणता डाव टाकतात याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

धनंजय मुंडेंना पुन्हा संधी मिळणार, की बीडच्या विजयसिंह पंडितांच्या रूपाने नवा चेहरा पुढे येणार? उत्तर एका निर्णयावर अवलंबून आहेआणि तो निर्णय कधीही जाहीर होऊ शकतो.

# महाराष्ट्रात पारा घसरला




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**
देशासह महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये थंडीचा प्रभाव दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. हिवाळ्याच्या सुरुवातीलाच तापमानात लक्षणीय घट झाल्याने नागरिकांना सकाळ-संध्याकाळ हुडहुडी भरू लागली आहे.

राज्यात सध्या बहुतांश भागात कोरडे वातावरण राहणार असून पुढील काही दिवस हवामानात मोठा बदल होणार नसल्याचे संकेत हवामान अभ्यासकांकडून दिले जात आहेत. मात्र, येत्या दोन दिवसांत कमाल आणि किमान तापमानात किंचित वाढ होईल, त्यानंतर पुन्हा एकदा तापमान २ ते ३ अंशांनी घसरण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे हिवाळ्याचा कडाका आणखी तीव्र होणार आहे.

राज्यातील विदर्भ विभागात थंडीचा प्रभाव सर्वाधिक जाणवत आहे. विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये किमान तापमान १२ अंशांच्या खाली घसरले आहे. यवतमाळ जिल्ह्यात आज किमान ९.६ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली असून अकोला आणि नागपूर येथे तापमान थेट १० अंशांवर आले आहे.

पहाटेच्या वेळी गारवा जाणवत असल्याने नागरिकांनी उबदार कपड्यांचा आधार घ्यायला सुरुवात केली आहे. ग्रामीण भागात तर थंडीचा फटका अधिक तीव्र असून शेतकरी, शेतमजूर आणि सकाळी लवकर कामावर जाणाऱ्यांना या थंडीचा मोठा सामना करावा लागत आहे.

मराठवाड्यातही थंडीचा जोर चांगलाच वाढला आहे. नांदेडमध्ये किमान तापमान ८.९ अंशांपर्यंत खाली आले असून हा या हंगामातील आतापर्यंतचा सर्वात कमी आकडा मानला जात आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे तापमान ११ अंशांवर नोंदवण्यात आले, तर परभणीत पारा थेट १०.८ अंशांवर घसरला आहे. मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये पहाटे दव पडत असून रस्त्यांवर गार वारे वाहत आहेत.

# शिंदे गटाने कुंटणखान्याशी जोडला सुषमा अंधारेंचा संबंध

■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १८ :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सातारा ड्रग्ज प्रकरणात आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणाऱ्या सुषमा अंधारेंवर शिंदे गटाने जोरदार पलटवार केला आहे. या प्रकरणी शिंदे गटाने सुषा अंधारेंचा संबंध बीडमधील एका कुंटणखान्याच्या मालकाशी जोडला आहे. कला केंद्रात सुरू असलेल्या छमछमशी सुषमा अंधारेंचा काय संबंध? असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

सुषमा अंधारे यांनी सातारा ड्रग्ज रॅकेट प्रकरणात सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे गटाच्या प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांनी सोलापुरात पत्रकारांशी संवाद साधताना त्यांच्यावर पलटवार केला आहे. या प्रकरणी त्यांनी अंधारेंचा शुर्पणखा असा केला. त्या म्हणाल्या, कालपासून एका शूर्पणखेने गोंधळ घातला आहे. शूर्पणखेने रामायणातही राम व लक्ष्मणावर खोटे आरोप केले होते. त्यानुसार, सुषमा अंधारे यांनी कॅमेऱ्याचा फोकस स्वतःकडे ठेवण्यासाठी एकनाथ शिंदेंवर धादांत खोटे आरोप केले.

**एकनाथ शिंदेंची नाहक बदनामी सुरू**

वाघमारे म्हणाल्या, एकनाथ शिंदेंच्या भावाच्या रिसॉर्टमध्ये ड्रग्जचा साठा आढळल्याचा सुषमा अंधारेंचा आरोप धादांत खोटा आहे. प्रकाश शिंदे यांनी आपण हे रिसॉर्ट भाड्याने चालवण्यास दिल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानंतरही महापालिका निवडणुकीच्या तोंडावर एकनाथ शिंदेंना बदनाम करण्यासाठी सुषमा अंधारे चिखलफेक करत आहेत. पण महाराष्ट्राची जनता त्यांना भीक घालणार नाही, असे त्या म्हणाल्यात.

झाला. त्याच्यावर एवढे गंभीर आरोप होऊनही तो जामिनावर सुटला. कुंटणखाना चालवणा?या रत्नाकर शिंदेला पुन्हा जिल्हाप्रमुख करण्यासाठी कुणी शिफारस केली होती हे सुषमा अंधारेंनी सांगावे.

अंजली दमानिया यांनी सदर कलाकेंद्रावर टाकण्यात आलेल्या छाप्याचा स्क्रीनशॉट शेअर केला होता. त्यात आरोपी असलेल्यांची नावे सत्वशीला बाबासाहेब अंधारे, आदित्य अंधारे, मयूर अंधारे अशी होती. या सगळ्यांचे सुषमा अंधारेंशी काय कनेक्शन आहे? नाचणाऱ्या अनेक मुलींची आडनावे अंधारे का आहेत? असे सवाल त्यांनी उपस्थित केले.

## मुंबईतील नाट्यरतन राष्ट्रीय महोत्सवासाठी

# इथेच टाका तंबू नाटकाची निवड

### यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ललित कला केंद्राची निर्मिती

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १८ :**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ललित कला केंद्राने इथेच टाका तंबू या दोन अंकी प्रायोगिक नाटकाची निर्मिती केली आहे.

पद्मविभूषण रतन टाटा यांच्या स्मरणार्थ मुंबईत येत्या दिनांक २५ ते २८ डिसेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या नाट्य रतन या बहुभाषिक राष्ट्रीय नाट्यमहोत्सवासाठी या नाटकाची निवड झाली आहे. विद्यापीठ ललित कला केंद्राचे प्रा. दत्ता पाटील लिखित व संचालक सचिन शिंदे यांचे दिग्दर्शन असलेले हे नाटक या महोत्सवात शनिवार २७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात सादर होईल.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव, शास्त्रोक्त शिक्षण प्रशिक्षण व व्यासपीठ मिळावे म्हणून विद्यापीठातर्फे ललित कला केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या कौशल्य विकासाच्या अन्य विविध उपक्रमांसोबत सांस्कृतिक क्षेत्रातही योगदान देण्यासाठी आणि नाट्यशास्त्र शिक्षणक्रमाच्या आजी माजी विद्यार्थ्यांना तज्ञ नामांकित कलावंतांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा मिळण्याच्या दृष्टीने या प्रायोगिक नाटकाची निर्मिती करण्यात आली आहे. सदर नाट्यरतन महोत्सवात महाराष्ट्रातील व महाराष्ट्राच्या बाहेरील एकूण १२ हिंदी, मराठी व इंग्रजी नाटके सादर केली जाणार आहेत.

लेखक दत्ता पाटील व दिग्दर्शक सचिन शिंदे यांची हंडाभर चांदण्या, तो राजहंस एक, कलगीतुरा, दगड आणि माती, गढीवरच्या पोरी यासह अनेक प्रायोगिक नाटके महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही गाजली आहेत. आता इथेच टाका तंबू हे प्रायोगिक नाटक एक वेगळा सामाजिक विषय घेऊन रंगभूमीवर येत आहे.

त्यात ओंकार गोवर्धन, अमेय बर्वे, अश्विनी कासार, उमेश जगताप यांच्या भूमिका असून नेपथ्य, पार्श्वसंगीत, रंगमंच व्यवस्था, प्रकाशयोजना यासह निर्मितीच्या विविध तांत्रिक बाजू तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या नाट्यशास्त्राचे आजीमाजी विद्यार्थी सांभाळत आहेत. नाशिकमध्ये रविवार २८ डिसेंबर रोजी




दुपारी १२.३० वाजता महाकवी कालिदास कलामंदिर येथे या नाटकाचा प्रयोग होईल. नाट्यरतन महोत्सवातील या नाटकाच्या निवडीबाबत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आनंद व्यक्त केला असून ललित कला केंद्राचे अभिनंदन केले आहे.

नाट्यविषयक शिक्षणक्रमाला चालना देणारे व विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घालणारे हे प्रायोगिक नाटक आहे. ललित कला केंद्राच्या माध्यमातून नाटकासह लोककला, संगीत, नृत्य या क्षेत्रातही भक्कम पाठबळ उभे करून विद्यार्थी कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध केले जाणार आहे. विद्यापीठाच्या ललित कला केंद्राची ही पहिलीच निर्मिती आहे. कलेच्या औपचारिक शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी जोडून घेण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल असे वाटते, अशा शब्दात कुलगुरू सोनवणे यांनी भावना व्यक्त केल्या.

# कोल्हापूर सर्किट बेंचला सर्वोच्च न्यायालयाचा कौल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**
कोल्हापूर उच्च न्यायालय सर्किट बेंच स्थापनेला दिलेले आव्हान सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावत न्यायप्रवेशाच्या मूलभूत संकल्पनेला बळ दिले आहे. सर्वसामान्य नागरिकांना सुलभ, जलद आणि परवडणारा न्याय मिळावा, या संविधानिक तत्त्वाशी कोल्हापूर खंडपीठाची स्थापना पूर्णतः सुसंगत असल्याचे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील लाखो नागरिकांना दिलासा मिळाला असून न्यायालयीन लढाईसाठी मुंबईपर्यंत जाण्याची अडचण आता कायमची दूर झाली आहे.




कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेत खंडपीठाची गरज नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाने हा दावा फेटाळून लावत स्पष्ट केले की, न्यायालये ही केवळ प्रशासकीय सोयीसाठी नसून नागरिकांच्या न्यायहक्कासाठी असतात. भौगोलिक अंतर, आर्थिक अडचणी आणि वेळेची मर्यादा यामुळे न्यायापासून वंचित राहणाऱ्या घटकांना जवळच्या ठिकाणी न्यायालय उपलब्ध करून देणे ही राज्याची आणि न्यायव्यवस्थेची जबाबदारी आहे, असे न्यायालयाने नमूद केले.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात संविधानातील समानता, न्यायप्रवेश आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा सविस्तर उल्लेख केला. न्याय मिळवण्यासाठी नागरिकांना शेकडो किलोमीटर प्रवास करावा लागू नये, हीच लोकशाही व्यवस्थेची खरी भावना असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

कोल्हापूर सर्किट बेंचमुळे कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर आणि परिसरातील जिल्ह्यांतील प्रकरणांची सुनावणी जलद होईल, यामुळे उच्च न्यायालयावरील ताणही कमी होणार आहे. या निर्णयामुळे पश्चिम महाराष्ट्रातील वकील संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# जिल्हा ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ



■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) : यंदा जिल्ह्याला शासनाने ८२ लक्ष रू. ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट दिले आहे. देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याचे महान कार्य करणा-या शूर सैनिकांप्रती कृतज्ञता म्हणून जिल्ह्यात उद्दिष्टाहून अधिक निधी संकलित होण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले. सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निमित्त ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांच्या हस्ते माजी सैनिक वसतिगृहात झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. ध्वजदिन निधी संकलन निधी समितीचे सदस्य जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, उपशिक्षणाधिकारी जितेंद्र कुमार प्रधान, जिल्हा सैनिक कल्याण

■ जिल्ह्याला ८२ लक्ष रू. चे उद्दिष्ट
■ प्रत्येकाने योगदान देण्याचे जिल्हाधिका-यांचे आवाहन

अधिकारी मेजर आनंद पाथरकर आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, अंगाची लाही करणारे ऊन, हाडे गोठवणारी थंडी, वादळवारे अशा वैविध्यपूर्ण भौगोलिक वैशिष्ट्ये व रचना असलेल्या निरनिराळ्या भागात सैनिक अहोरात्र देशसंरक्षणाचे कार्य करत असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व आज सुरक्षित आहोत. वीरजवान व त्यांच्या कुटुंबियांसाठी ध्वजदिन निधीतून विविध योजना राबवल्या जातात. गतवर्षी जिल्ह्याने उद्दिष्ट्याच्या ११० टक्के पूर्तता केली. यंदाही उद्दिष्टाहून अधिक निधी संकलित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मेजर आनंद पाथरकर यांनी प्रास्ताविकात सैनिक व त्यांच्या कुटुंबियांसाठी राबविण्यात येणा-या उपक्रमांची माहिती दिली. वैभवकुमार निमकर यांनी सूत्रसंचालन केले. देशासाठी प्राणांचे बलिदान देणा-या सैनिकांच्या कुटुंबातील वीरमाता व वीरपत्नी यांना यावेळी गौरविण्यात आले. माजी सैनिकांच्या कुटुंबियांतील गुणवंत पाल्यांचाही विशेष पुरस्कार देऊन गौरव झाला. क्रीडापटू गणेश वानखडे, क्रीडापटू सिमरन गवई यांना प्रत्येकी २५ हजार रू. व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. दहावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थिनी अंजली मोहाडे यांना २० हजार रू. व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

# अकोला जिल्हाधिकारी कार्यालयाला बॉम्बस्फोटाची धमकी; प्रशासन-पोलीस यंत्रणा अलर्ट

## ▪निनावी ई-मेलमुळे खळबळ, संपूर्ण कार्यालय रिकामे
## ▪बॉम्ब शोधक पथक व सायबर सेलकडून कसून तपास

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) : अकोला जिल्हाधिकारी कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने गुरुवारी सकाळी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा हादरून गेली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत ई-मेल आयडीवर आलेल्या निनावी धमकीमुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले असून, प्रशासन व पोलीस यंत्रणांनी तातडीने युद्धपातळीवर हालचाली सुरू केल्या. आज गुरुवार, १८ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शासकीय ई-मेलवर अत्यंत गंभीर स्वरूपाचा संदेश प्राप्त झाला.

दुपारी २ वाजेपर्यंत कार्यालय रिकामे करा, अन्यथा बॉम्बस्फोट घडवून आणू, असा थेट आणि जीवघेणा इशारा या ई-मेलमध्ये देण्यात आला होता. धमकी मिळताच जिल्हाधिकारी प्रशासनाने क्षणाचाही विलंब न करता पोलीस अधीक्षकांना माहिती दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालय तात्काळ रिकामे केले.

**खोडसाळपणा की गंभीर कट? : ही धमकी विकृत मानसिकतेतून केलेला खोडसाळ प्रकार आहे की प्रशासनाला लक्ष्य करणारा गंभीर कट, याचा तपास पोलीस करत आहेत. मात्र, अकोल्याच्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीला बॉम्बस्फोटाची धमकी मिळणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात असून, या घटनेमुळे प्रशासकीय वतुर्ळात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. कार्यालय परिसर पूर्णतः सील करण्यात आला असून, सर्वसामान्य नागरिकांना प्रवेशास सक्त मनाई करण्यात आली आहे. वृत्त लिहेस्तोवर दुपारी २ वाजेपर्यंत शोधमोहीम सुरू होती, त्यामुळे प्रशासकीय कामकाज ठप्प झाले होते.

घटनास्थळी मोठ्या प्रमाणात सुरक्षायंत्रणा तैनात करण्यात आली आहे. बॉम्ब शोधक व नाशक पथक, श्वान पथक, दहशतवादविरोधी पथक, पोलीस दल, अग्निशमन विभाग आणि रुग्णवाहिका तत्काळ दाखल झाल्या. कार्यालयातील प्रत्येक मजला, कक्ष, कपाटे, वाहनतळ तसेच आजूबाजूच्या परिसराची कसून तपासणी सुरू आहे. दरम्यान, धमकीचा ई-मेल नेमका कुठून आला, कोणत्या आयपी अ‍ॅड्रेसवरून पाठवण्यात आला आणि यामागे कोण आहे.

याचा शोध घेण्यासाठी सायबर सेल पूर्ण क्षमतेने सक्रिय झाला असून तांत्रिक तपास युद्धपातळीवर सुरू आहे. शहरातील सुरक्षा व्यवस्थेतही वाढ करण्यात आली आहे.

## आज तीन दिवसीय कीर्तन महोत्सव

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) : गोरक्षण व गोसंवर्धन सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या वतीने किर्तन सेवेकरी स्व. सौ शालिनी वामनराव नाईकवाडे यांच्या स्मृतीत आज दि १९ डिसें ते २१ डिसें पर्यंत साय ५-३० वा स्थानीय प्रमिलाताई ओक हॉल सभागृहात कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यात आज दि. १९ डिसेंबर रोजी पुणे येथील हभप हर्षद बुवा जोगळेकर यांचे 'विठ्ठल भक्त जळोजी-मळोजी' या विषयावर कीर्तन होणार आहे.उद्या शनिवार दि. २० डिसेंबर रोजी पुणे येथील हभप लक्ष्मीप्रसाद बुवा पटवारी यांचे 'बाजीप्रभू देशपांडे' यावर आधारित कीर्तन होऊन रविवार दि. २१ डिसेंबर रोजी अकोला येथील हभप डॉ अभय कुलकर्णी यांचे 'ललीतांचे कीर्तन' यावर आधारित कीर्तन होणार आहे.या कीर्तन महोत्सवाचा समस्त किर्तन प्रेमी भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन नाईकवाडे परिवार, प्राचार्य वामनराव उर्फ भाऊसाहेब नाईकवाडे,प्रा विजयराव अंधारे,प्रा शैलजा अंधारे,प्रवीण नाईकवाडे, प्रा. विवेक बिडवई समवेत आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या समस्त संचालक वर्गाने केले आहे.

# संत सोपान काकांचा समाधी सोहळा
## -भागवताचार्य ज्ञानेश्वरमहाराज वाघ

(प्रतीनीधी) बाळासाहेब नेरकर

वैदिक परंपरेला मान्य असलेल्या अवतार संकल्पनेतील उत्पत्ती , स्थिती व लयास कारण असणाऱ्या ब्रह्मा , विष्णू व महेश या त्रिदेवांचे अवतार अनुक्रमे निवृत्तीनाथ , ज्ञानोबाराय व सोपान काका हे वारकरी संप्रदायाच्या संत परंपरेतील अग्रणी संत होत. पृथ्वीतलावर राक्षसांमुळे निर्माण झालेली अराजकता नष्ट करून पुनश्च धर्माची संस्थापना करण्यात करिता अनेकदा भगवंतांनी अवतार घेतल्याचा उल्लेख भारतीय पौराणिक इतिहासात वाचण्याकरिता मिळतो. त्यात प्रामुख्याने अवतार हे स्थिती व लयास कारणीभूत असणाऱ्या हरिहरांचेच झाल्याचे दिसून येतात, सृष्टोत्पत्ती करणाऱ्या ब्रह्मदेवाचे नाहीत. परंतु जगदोद्धारार्थ अवतीर्ण होत असतांना मात्र हे देवत्रय संयुक्तपणे या बंधुत्रयांच्यारूपाने अवतरीत झाले. त्यातील ब्रह्मदेवाचा संत स्वरूपातील प्रथमावतार असणाऱ्या सोपान काकांच्या पुण्यतिथी निमित्ताने थोडेसे चिंतन.

तिन्ही देव जैसे परब्रह्मीचे ठसे श्र जगीं सूर्य तैसे प्रकाशले श्रश्र धन्य तो निवृत्ती धन्य तो सोपान श्र धन्य तो निधान ज्ञानदेव श्रश्र या संत चरित्राचे आद्य इतिहासकार भगवान पांडुरंगाचे प्रेम भंडारी असणाऱ्या नामदेवरायांच्या वचनानुसार जगात सूर्याप्रमाणे प्रगटलेले हे प्रत्यक्ष परब्रह्मीचे ठसे असणाऱ्या तिन्ही देवांपैकी निवृत्तीनाथ व ज्ञानोबाराय या गुरुशिष्यद्वयांच्या वाङ्मय व चरित्राचा बऱ्यापैकी प्रचार व प्रसार झाला. परंतु सोपान देव मात्र रामायणातील शत्रुघ्न या पात्राप्रमाणे उपेक्षित किंवा अलिप्तच राहण्याचे दर्शनास येते. त्यामुळेच त्यांच्या चरित्राचा कीर्तना-प्रवाचनादिकांच्या माध्यमातून पाहिजे तेवढ्या प्रमाणात उहापोह झाल्याचे दिसून येत नाही. गुर्वाज्ञेनी



विठ्ठलपंतांनी संन्याशाश्रमाचा त्याग करून पुनश्च गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतर आळंदील लोकांनी वाडीत टाकल्यानंतर सिद्ध बेटांमध्ये उपेक्षित जीवन जगत असतांना तब्बल बारा वर्षाच्या तपश्चर्या व प्रतीक्षेनंतर प्रत्येकी दोन वर्षाच्या अंतराने प्रथम निवृत्तीनाथ व ज्ञानोबारायांच्या पाठी व आदिशक्ती मुक्ताईच्या आधी ईश्वर नाम संवत्सरात कार्तिक शुद्ध पौर्णिमेला शके ११९९ रविवारी एक प्रहर रात्र समयाला कृतिका नक्षत्राच्या दुसऱ्या चरणात सन २०.११.१२७७ ला सोपान काकांचा अवतार झाला.

विठ्ठलपंत आणि रुक्मिणी देवी यांच्या देहान्तप्रायश्चितानंतर दोन्ही ज्येष्ठ बंधू भिक्षेस गेल्यानंतर धाकट्या मुक्ताईना सांभाळण्याचे काम सोपान काका करीत असायचे. ' निवृत्तीदेव म्हणे सांगतो या वाचे श्र राहणे चौघांचे एकरूप श्रश्र निवृत्तीनाथांच्या वचनानुसार या बंधू व संतचतुष्ट्यांचे राहणे एकरूपच असल्यामुळे त्यांच्या वेगवेगळ्या चरित्राचे प्रयोजन शिल्लक राहिले नाही.

## थोडक्यात

### वडगावच्या युवकावर पोक्सोचा गुन्हा दाखल

**बार्शिटाकळी :** तालुक्यातील पिंजर पोलिस स्टेशन कार्यक्षेत्रातील वडगावच्या युवकावर पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंजर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एका ३५ वर्षीय व्यक्तीने दिलेल्या फिर्यादीनुसार, १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला विविध प्रकारचा त्रास दिल्याने पिंजर पोलिसांनी आरोपी मंगेश अजबराव जाधव यांच्यावर कलम ७५, ७८, ७९, ३५१ (२), ३५२ बीएनएस सहकलम ८, १२ पोक्सो अधिनियम प्रमाणे कारवाई करून अटक केली. सदर घटनेचा तपास पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे करीत आहेत.

### महिला व बालविकास विभागात अर्जाची मुदत सोमवारी संपणार

**अकोला :** महिला व बाल विकास विभाग, पुणे अंतर्गत संरक्षणअधिकारी (कनिष्ठ) पदांच्या १७ रिक्त जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहे. अर्ज ऑनलाइन पद्धतीने करायचा आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख २२ डिसेंबर आहे. शैक्षणिक पात्रता पदाच्या आवश्यकतेनुसार आहे.नोकरीचे ठिकाण पुणे आहे. वयोमर्यादा १८ ते ४३ वर्षे आहे. अधिक माहिती स्पे दन्ह या संकेतस्थळावर आहे.

### बिबट्यासह ४ पिल्ले आढळले

**बाळापूर :** अकोला ते शेगाव या दिंडी मार्गावरील कसुरा नजीक असलेल्या संत गजानन महाराज मंदिराजवळ बिबट्यासह ४ पिल्ले आढळून आली असून, ४ पैकी १ पिल्लू रस्त्याने जाणाऱ्या नागरिकाने पकडले. अकोला - शेगाव दिंडी मार्गाने बुधवारी काही लोक जात असताना अचानक बिबट्यासह ४ पिल्ले जाताना आढळून आले. बिबट्या व ३ पिल्ले पुढे निघून जाण्यात यशस्वी झाले. मात्र ४ पैकी बिबट्याचे १ पिल्लू नागरिकांनी पकडले. या संदर्भात माजी सरपंच विठ्ठल दही यांनी वन विभाग व उरळ पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच उरळ पोलिस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी कसुरा येथे पोहोचले. तर पकडून ठेवलेल्या बिबट्याच्या बछड्यास वन विभागाने ताब्यात घेतले. यावेळी माजी सरपंच विठ्ठल दही, सुभाष खेडकर, सुनील वासनकर, अवि ईधोळ, राजू साटोटे, दिलीप गव्हाळे, मुजीलाल कोरकू उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगावी असे आवाहनबाळापूर तहसीलदार वैभव फरतारेयांनी केले.

# पद्मविभूषण डॉ.मोहन धारिया जन्मशताब्दी निमित्त
## १७ व १८ जानेवारीला अकोल्यात वनराई बालकुमार साहित्य संमेलनाचे आयोजन




■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) : विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती,निसर्ग प्रेम व वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धींगत करण्यासाठी वनराई युथ फाऊंडेशनच्या वतीने माजी केंद्रीय मंत्री, ज्येष्ठ स्वतंत्रता सेनानी पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया जन्मशताब्दी निमित्त अकोला येथे दिनांक १७ व १८ जानेवारी २०२६ ला वनराई बालकुमार साहित्य संमेलनाचे आयोजन केले असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक बबनराव कानकिरड व गजानन जनार्दन चौधरी यांनी दिली आहे.

राजकीय कोलाहापासून अलिप्त राहून ज्यांनी आपल्या आयुष्याचे शब्द, श्वास आणि श्रम भारत मातेच्या सेवेसाठी समर्पित केले असे डॉ. मोहन धारिया हे पर्यावरण चळवळीचे दीपस्तंभ मानले जातात.त्यांचे अजोड कार्य उदयोन्मुख पिढीने अभ्यासावे, त्यांच्या विचाराचा वसा आणि वारसा पुढे नेण्यासाठी हे संमेलन प्रेरणादायी ठरणार आहे. वनराई चळवळीने वनीकरण, पर्यावरण, जल संवर्धनाच्या जन आंदोलनासाठी देश पातळीवर विविध उपक्रम राबवले त्याची ऊजळणी या संमेलनात होणार आहे. बालकुमारां चे भाव विश्व फुलवण्यासाठी वनराईचा संदेश देण्यात येईल. जल, जंगल,जमीन, जनावर, जीव,जंतू व जनता या घटकांसोबत माणूस केंद्रस्थानी ठेवून जैवविविधतेवर आधारित सात सूत्री पर्यावरणीय 'सेवन जे ' जाहीरनामा जलसंवर्धन क्षेत्रातील अग्रणी कार्यकत्याच्या माध्यमातुन जाहीर करण्यात येणार आहे. 'निसर्गाशी संघर्ष नव्हे तर सहजीवन हाच विकासाचा खरा मार्ग आहे.

# पुणे ते अजनी वंदे भारत एक्सप्रेस आणि सुरत ते भुसावळ एक्सप्रेस वेळेमध्ये बदल

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) : रेल्वे प्रशासना द्वारा प्रवाशांच्या सोयीसाठी गाडी क्रमांक २६१०१ पुणे ते अजनी वंदे भारत एक्सप्रेसच्या अकोला आणि बडनेरा स्थानकावर आगमन आणि प्रस्थान वेळेत बदल करण्यात आला आहे. तसेच गाडी क्रमांक १९००५ सुरत ते भुसावळ एक्सप्रेसच्या जळगाव आणि भादली या स्थानकावर आगमन आणि प्रस्थान वेळेत बदल करण्यात आला आहे. हा बदल दिनांक २६.१२.२०२५ पासून लागू होणार आहे. सुधारित वेळापत्रक पुढीलप्रमाणे १) गाडी क्रमांक २६१०१ पुणे ते अजनी वंदे भारत एक्सप्रेस अकोला स्थानक सुधारित आगमन वेळ - १४.४० आणि सुटण्याची वेळ १४.४२ असेल. बडनेरा स्थानक सुधारित आगमन वेळ - १५.४८ आणि सुटण्याची वेळ १५.५० असेल. २) गाडी क्रमांक १९००५ सुरत ते भुसावळ एक्सप्रेस जळगाव स्थानक सुधारित आगमन वेळ - ०६.५८



आणि सुटण्याची वेळ ०७.०० असेल.भादली स्थानक सुधारित आगमन वेळ - ०७.१० आणि सुटण्याची वेळ ०७.११ असेल.गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस (NTES) अ‍ॅप डाउनलोड करा.प्रवाशांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी या बदलाची नोंद घावी.

# कानशिवणी हमीभाव खरेदी सेवा केंद्रावर खरेदी प्रारंभ

■कानशिवणी,दि १८ (प्रतिनिधी) : कानशिवणी फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड कानशिवणी (नाफेड) केंद्रामध्ये आजपासून खरेदीला शुभारंभ करण्यात आला. आयोजित कार्यक्रमात गोपालकृष्ण गोसेवा केंद्राचे अध्यक्ष स्थानी असलेले प्रकाशजी वाघमारे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विनायकरावजी शेळके हे होते. तर उद्घाटन प्रकाशजी वाघमारे यांच्या हस्ते नाफेड अंतर्गत सोयाबीन खरेदी केंद्रावर खरेदीला प्रारंभ झाला, यावेळी प्रथम सोयाबीन घेऊन आलेले शेतकरी मारोती पंजाबराव वाघमारे याचे शेतकऱ्यांचे शाल श्रीफळ देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रसंगी प्रमुख उपस्थिती नाफेड केंद्र प्रमुख विनायकराव शेळके, संचालक राहुलजी शेळके, बाबाराव सारसे, वासुदेवराव शेळके , बंडू छबिले, अशोकराव शेळके,



सुरेश बरडे, गोपाल पोटे, कैलास कावरे, सुदर्शन शेळके, इंगोले, गोपाल वाघमारे आदी सह शेकडो शेतकरी उपस्थित होते,दरम्यान महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे संचलित हमीभाव खरेदी सेवा केंद्रा कानशिवणी येथे शेतकऱ्यांनी आपले सुकलेले व चांगले सोयाबीन घेऊन येण्याचे आवाहन विनायकरावजी शेळके यांनी केले आहे, यावेळी एन.ई.एम.एल. चे जिल्हा प्रतिनिधी दिनेश देशमुख व एन. सि.एम. एल कंपनीचे ग्रेडर सुदर्शन शेळके उपस्थित होते. दरम्यान राहुल शेळके हमीभाव खरेदी सेवा केंद्र कानशिवणी यांनीही आपले विचार व्यक्त करतांना सांगितले की सशक्त शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी व समस्या सोडविण्यासाठी खरेदी केंद्रावर विशेष लक्ष दिले जाईल असे आश्वासन दिले तर आभार गोपाल वाघमारे यांनी केले.

# शुभमंगल कार्यालयात २० व २१ डिसेंबर रोज रोजी पुष्प प्रदर्शनी

## अकोला गार्डन क्लब व महाबीज चा संयुक्त उपक्रम, प्रशस्त अशा शुभ मंगल कार्यालयात आयोजन

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) : दिनांक २० व २१ डिसेंबर ला दोन दिवसीय पुष्पप्रदर्शन अकोल्यातील गोरक्षण रोडवरील शुभमंगल कार्यालयात सर्वांकरीता खुले असून, अकोला गार्डन क्लब व महाबीज च्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. निसर्गप्रेमी व पुष्प प्रेमी नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा असं आवाहन अकोला गार्डन क्लबचे अध्यक्ष संजय शर्मा यांनी केलं आहे.

अकोला गार्डन क्लब ही संस्था मागील ५१ वर्षापासून पुष्पप्रदर्शनाचे भव्य दिव्य असे आयोजन करत असते. यंदा या संस्थेचं हे ५२ वे वर्ष असून, इथे १००० पेक्षा जास्त फुल व झाडांच्या जाती व प्रकार अकोलेकरांना बघायला मिळणार आहे. सकाळी दहा




ते रात्री आठ या वेळेत सर्वांसाठी हे प्रदर्शन सुरू असेल . शालेय विद्यार्थी सुद्धा या प्रदर्शनीला भेट देऊ शकतात. यंदाच्या प्रदर्शनात महिला व मुलांकरता विविध गेम शो चे सुद्धा आयोजन गार्डन क्लबच्या महिला विंग तर्फे कारण्यात आले आहे. त्याचप्रमाणे फूड स्टॉल सुद्धा तिथे उपलब्ध असतील, तसेच घरगुती गार्डन करिता लागणाऱ्या साहित्याचे व शोभिवंत फुलझडाचे स्टॉल विक्रीकरिता तिथे उपलब्ध असतील. अशी माहिती गार्डन क्लब तर्फे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये जेष्ठ पर्यावरण तज्ञ शरद कोकाटे यांनी दिली.

गुलाब व शेवंती शिवाय इतरही नवनवीन फुल यंदाच्या प्रदर्शनीचे आकर्षण असणार आहे. सोबतच विविध प्रकारचे बोन्साय व आकर्षक झाड सुद्धा बघायला मिळतील. गुलाबांच्या फुलांच्या विविध रंगबिरंगी छटा या प्रदर्शनीत अकोलेकरांना बघायला मिळतील. याशिवाय औषधी गुणधर्म असणाऱ्या झाडांचे सुद्धा एक विशेष दालन इथे उपलब्ध असेल. वीस तारखेला सकाळी दहा वाजता जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते प्रदर्शनीचे उद्घाटन होणार असून, प्रमुख उपस्थिती म्हणून महाबीज च्या व्यवस्थापकीय संचालक एस. भुवनेश्वरी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर हे प्रदर्शन नागरिकांसाठी सुरू असणार आहे. अकोलेकरांनी या पुष्प प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असं आवाहन गार्डन क्लबचे सचिव श्याम गोटफफोडे, माजी अध्यक्ष अजय सेंगर व अकोला गार्डन क्लबच्या इतर पदाधिकाऱ्यांनी केलं आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) : अल्पसंख्याक हक्क दिवसानिमित्त विशेष कार्यक्रम नियोजनभवनात आज झाला. यावेळी अल्पसंख्याकांसाठी राबविण्यात येणा-या विविध योजना- उपक्रमांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाला धर्मगुरू धम्मचारी कृपावीर, जैन मंदिराचे अध्यक्ष मयूर जैन, मुफ्ती अशफाक कास्मी काजी, कारमेल स्कूलचे प्राचार्य, श्री गुरू तेगबहादूर गुरूद्वाराचे सचिव गुरूमितसिंग गोसाल, सहायक नियोजन अधिकारी श्री. सातपुते, उपशिक्षणाधिकारी सुभाष भालेराव, महाराष्ट्र मायनॉरिटी एनजीओ फोरमचे अध्यक्ष डॉ. जुबैर नदीम, राज्य सदस्य मोहम्मद रफीक, वक्फ अधिकारी इब्राहिम शेख, मौलाना आझाद विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक ज्योती भगत, अल्पसंख्याक विकास केंद्राचे सचिव डॉ मुजाहिद अहमद, पोलीस निरीक्षक अनिल जुमडे आदींनी यावेळी मार्गदर्शन केले.

भारत हा विविध संस्कृती,भाषा, धर्म, परंपरा आणि विचारधारांचा विशाल संगम आहे. अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण व संवर्धनाची जाणीव बाळगून दरवर्षी १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा केला जातो. यानिमित्त सर्व शाळांमध्ये वॉल पोस्टर निर्मिती स्पर्धा, निबंधलेखन, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री. नदीम यांनी यावेळी दिली.

# अकोट-अकोला रेल्वे: 'वेळापत्रक' की प्रवाशांची क्रूर थट्टा ?

## ना रेल्वे पकडता येते, ना सुविधेचा पत्ता



▪**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :**
अकोट-अकोला रेल्वे मार्ग सुरू होऊन तीन वर्षे उलटली, तरी या मार्गावरील प्रवाशांच्या समस्या 'जैसे थे' आहेत. रेल्वे प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे अकोटमधील प्रवाशांना रेल्वे असूनही रस्ता मार्गाने प्रवास करावा लागत आहे. विशेषतः अकोल्यावरून सुटणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या आणि अकोट-अकोला रेल्वेच्या वेळा यांचा ताळमेळ नसल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

वेळापत्रकाचा असा आहे 'अजब' खेळ

सकाळची पहिली अकोट-अकोला फेरी सकाळी ९:४० वाजता अकोल्यात पोहोचते. मात्र, त्यापूर्वीच नागपूर, हावडा, पुरी आणि काचीगुडा या महत्त्वाच्या दिशेला जाणाऱ्या बऱ्याच गाड्या मार्गस्थ झालेल्या असतात. रात्रीच्या वेळीही तीच परिस्थिती आहे. रात्री ८:१० वाजता शेवटची फेरी अकोल्यात पोहोचते, पण तोपर्यंत मुंबई, पुणे, अहमदाबाद आणि हैदराबादकडे जाणाऱ्या बऱ्याच महत्त्वाच्या गाड्या स्थानकावरून सुटलेल्या असतात.प्रवाशांना आर्थिक भुर्दंड, रेल्वे उत्पन्नालाही 'ब्रेक' या विसंगत वेळापत्रकामुळे प्रवाशांना इच्छित स्थळी जाण्यासाठी खाजगी वाहनांचा किंवा एसटीचा आधार घ्यावा लागतो. याचा थेट फटका रेल्वेच्या उत्पन्नाला बसत असून, प्रवाशांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. विद्यार्थी, व्यापारी आणि नियमित प्रवाशांशी कोणतीही चर्चा न करता हे जाचक वेळापत्रक त्यांच्या माथी मारण्यात आल्याचा आरोप होत आहे.अकोट स्थानकावर मूलभूत सुविधांचा दुष्काळ केवळ वेळापत्रकच नाही, तर अकोट रेल्वे स्थानकावर सोयी-

- आरक्षण केंद्र: स्वतंत्र रिझर्व्हेशन काउंटर नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.
- लोको रिव्हर्स सुविधा: इंजिन बदलण्याच्या तांत्रिक सुविधेचा अभाव अद्याप कायम आहे.
- सुरक्षा व प्रकाश: स्थानकावर पुरेशी प्रकाश व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी असुरक्षितता वाटते.
- पिण्याचे पाणी: प्रवाशांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची साधी सोयही उपलब्ध नाही.

सुविधांचाही बोजवारा उडाला आहे. गेल्या तीन वर्षांपासून खालील मागण्या प्रलंबित आहेत या गंभीर प्रश्नांकडे रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अकोट येथील त्रस्त नागरिक, विद्यार्थी आणि व्यापाऱ्यांनी अकोल्याच्या खासदारांकडे तक्रार केली आहे. तातडीने वेळापत्रकात बदल करून सुविधा पुरवण्याची मागणी नांदेड अकोला खंडवा रेल्वे संघर्ष समितीचे रमण अग्रवाल, विजय जितकर, संदीप अग्रवाल, मनोज गुप्ता,संदीप बुब, अशोक संताने, नितीन बाबू अग्रवाल यांनी केली आहे.

## बसस्थानकावर चोरीचा प्रयत्न फसला!

▪**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :**
अकोला बसस्थानकावर चोरीचा प्रयत्न खदान पोलिसांच्या सतर्कतेमुळे वेळेत उधळून लावण्यात आला. वाशिम येथील या नाशिकहून आपल्या गावी परतत असताना अकोला बसस्थानकावर अज्ञातव्यक्तीने त्यांच्या बॅगमधील पर्सचोरली. सदर पर्समध्ये साडेसात ग्रॅम सोन्याची चेन व काही रोकड होती. घटनेची माहिती मिळताच संबंधित एसटी बस खदान पोलीस ठाण्यासमोर थांबवण्यात आली. खदान पोलिसांनी तत्काळ कारवाई करत बसची झाडाझडती घेतली. तपासादरम्यान चोरीस गेलेली पर्स व त्यातील मौल्यवान ऐवज पोलिसांना सापडला. त्यामुळेप्रवाशाचे नुकसान टळले. ऐवज सुरक्षितपणे परत मिळाल्याने राठोड या महिलेने यांनी पोलिसांचे आभार मानले

# अनैतिक मानवी वाहतुक विरोधी कक्षाने आजपर्यंत १२५ गुन्हे आणले उघडकीस

▪**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :**
जिल्ह्या मध्ये मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक सा. तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक बि. चंद्रकांत रेडडी सा. शहर उपविभाग पोलीस उपअधिक्षक श्री. सुदर्शन पाटील सा यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक कक्ष महीला व बाल अत्याचारासंदर्भाने कलम ३६३ भादवि / १३७ (२) भा. न्या. सं चा तपास करत आहे. अनैतिक मानवी वाहतुक कक्षाने आज पावेतो एकुण १२५ गुन्हे उघडकिस आणले आहेत. पोलीस स्टेशन सिव्हिल लाईन, अकोला येथील अप नं ८९/२०२५ क १३७ (२) भान्यासं चा गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक कक्ष अकोला येथे



दिनांक १९/०९/२०२५ रोजी प्राप्त झाली. सदर गुन्हयातील पिडीत व आरोपी यांचे बाबत गुप्त बातमीदारा मार्फत माहीती काढली असता सदर पिडीता व आरोपी हे कुर्कुभ ता दौड पुणे येथे राहत असल्याबाबत माहीती मिळवली. सदर प्रकरणी तपास व शोध कामी वरीष्ठांच्या मार्गदर्शनात विशेष तपास पथक तयार करून अ.मा.वा. प्र कक्ष येथील स्टॉप ग्राम कुर्कुभ पोस्टे दौड, जि. पुणे येथे रवाना करून मिळालेल्या माहीती नुसार कुर्कुभ ता दौड पुणे येथील सम ाधान पवार यांचे कडे जावुन पिडीत व आरोपी यांचा शोध घेत असतांना पिडीत मुलगी व आरोपी हे मिळुन आले. त्यांना अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष अकोला येथे परत आणुन पुढील तपासकामी तपास डायरी, पिडीत मुलगी व आरोपी यांना पोलीस स्टेशन सिव्हिल लाईन, अकोला येथील पोलीस स्टॉप यांचे ताब्यात देण्यात आले.

# तब्बल ३१ वर्षांनंतर दहावीतील वर्गमित्रांचे पुन्हा जुळले भावबंध!

▪**पातुर,दि १८ (प्रतिनिधी) :**
दहावीच्या परीक्षेनंतर एकमेकांपासून ताटातूट झालेले व आपल्या जीवनात रममाण झालेल्या घनिष्ठ वर्गमित्रांचे तब्बल ३१ वर्षांनंतर पुन्हा एकदा भावबंध जुळून आले व या वर्गमित्रांचा हृद्य स्नेहमेळा रविवार दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संत सेवालाल महाराज सभागृहामध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. ३१ वर्षांनंतर भेटल्यामुळे सर्वांच्याच भावनांना पारावार राहिला नव्हता. या मेळाव्याला मित्रांचे कुटुंबीयदेखील उपस्थित असल्याने



कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित झाला.सर्वप्रथम राष्ट्रगीत आणि दीपप्रज्वलनाने स्नेहमेळ्याची सुरवात झाली. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक सचिव रामसिंग जाधव हे उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान वसंतराव नाईक विद्यालयाचे माजी प्राचार्य जयसिंग जाधव यांनी भूषविले.

## डॉ. सुनीता कावळे (बर्गे) यांचा सेवाग्राम येथे सन्मान सोहळा संपन्न



▪**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :**
जिल्हा येथील सुप्रसिद्ध योग प्रशिक्षिका डॉ सौ सुनीता कावळे (बर्गे) यांना गांधी पीस फाऊंडेशन (युनायटेड नॅशनल नेपाळ) तर्फे सेवाग्राम आश्रम वर्धा येथे, मानद डॉक्टरेट व गांधी पीस नोबेल अवार्ड वितरण करुन सन्मानाने गौरव करण्यात आला. डॉ सुनिता कावळे ह्या एम ए योगशास्त्र,वाय सी बी ईव्हाल्युएटर असुन पीजीडीएनवायएस, सुजोक व पंचकर्म या क्षेत्रात त्यांचे विशेष योगदान आहे. त्या टिळक पार्क रामदास पेठ अकोला येथे नियमित योग वर्ग घेतात.डॉ सौ सुनीता कावळे (बर्गे)✲ यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरावरून त्यांचे कौतुक होत आहे व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# आखतवाडा येथे लोकसहभागातून वनराई बंधारा

▪**आखतवाडा दि १८ (प्रतिनिधी) :**
'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत मौजे आखतवाडा येथे ग्रामस्थांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागातून वनराई बंधाऱ्याची यशस्वी उभारणी केली आहे. या उपक्रमामुळे गावातील भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून, शेतीसाठी भेडसावणारे पाण्याचे संकट कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे व या उपक्रमातून इतर गावांनाही प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे.जलसंधारणाच्या या महत्त्वपूर्ण कामात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दुष्काळसदृश परिस्थितीत पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्यासाठी हा वनराई बंधारा



उपयुक्त ठरणार आहे. या उपक्रमाला कृषी विभागाचे तांत्रिक मार्गदर्शन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींचे सहकार्य लाभले. या वेळी शेतकरी श्री रामेश्वर चिपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. विभागाकडून उप विभागीय कृषी अधिकारी श्री विवेक बिन्हाडे, तालुका कृषी अधिकारी श्री वाशीमकर ,मंडळ कृषी अधिकारी श्री बेले, तालुक्यातील उप कृषी अधिकारी श्री देशमुख, सहायक कृषी अधिकारी श्री वानखडे,श्री वाकोडे,श्री हिवाळे,श्री बंड,श्री बोळे श्री घाटोळ,सौ राऊत, सौ अटंमबर यांनी बंधाऱ्याच्या उभारणीसाठी तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच नरेंद्र महाराज गट अकोला यांचे महिला यांनी मोठ्या संख्येने श्रमदान केले.

# पत्रकार दिनी जनहिताचा परिसंवाद

## अकोला पत्रकार समूहाचा उपक्रम

▪**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :**
अकोला पत्रकार समूहाचे वतीने बाळशास्त्री जांभेकर स्मृती पत्रकार दिन ६ जानेवारी २०२६ ला नगर सेवक कसा असावा,कसा नसावा या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात अकोला जिल्हा पत्रकार संघाच्या पत्रकार भवनात जेंष्ठ पत्रकार सिद्धार्थ शर्मा यांच्या अध्यक्षतेत पत्रकार संघटनांची बैठक संपन्न झाली.या बैठकीत अकोला जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकतअली मिरसाहेब,संजय खांडेकर, बहुजन पत्रकार संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम आवारे, अकोला श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रबोध देशपांडे,राजू उखळर्क,एड सुधाकर खुमर्क,

कमलकिशोर शर्मा,दीपक देशपांडे,एड शरद गांधी, मनीष खर्चे आदी पत्रकार उपस्थित होते. पत्रकार दिनी ६ जानेवारीला



दुपारी ३ वाजता प्रमिलाताई ओक हाल मध्ये आयोजित हा परिसंवाद पूर्णपणे अराजकीय असून या मध्ये सामाजिक,साहित्यिक,शिक्षण,कृषी,सहकार, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रातील नामावंत मान्यवर आपले मत मांडणार आहेत.ज्येष्ठ पत्रकार प्रकाश पोहरे यांच्या अध्यक्षतेत आयोजित हा उपक्रम अकोला महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारा मध्ये जागृती व्हावी.

# श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी पंधरवडा निमित्त दिनदर्शिकेचे विमोचन

▪**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :**
श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथी पंधरवड्यानिमित्त श्री संताजी सेना, अकोला यांच्या वतीने संताजीभक्त दिनदर्शिकेचा भव्य विमोचन सोहळा श्री संताजी नगर येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विष्णुपंत मेहेरे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संताजी सेना अध्यक्ष प्रमोद देंडवे यांच्यासह दीपक हिचे, दिलीप नायसे, मदन भिरड, ठाकूरदास चौधरी, बालमुकुंद भिरड, माणिक नालट, रामेश्वर वानखडे, दिलीप क्षीरसागर, प्रवीण झापर्डे, देवाशिष काकड, मंगेश वानखडे, संजय जयसनपुरे, कैलास दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात संताजी सेनेच्या विविध सामाजिक व संघटनात्मक कार्याचा सविस्तर आढावा जिल्हाध्यक्ष मनोज जुमळे यांनी मांडला. तसेच सम



ाजकार्य व विविध उपक्रमांची माहिती योगेश गोतमारे यांनी उपस्थितांना दिली. संताजीभक्त दिनदर्शिकेचे विमोचन मनीष थोटांगे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सागर नालट यांनी मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल धनभर, अभी धनभर, अभी देंडवे, वैभव धनभर, ऋषी गोतमारे, शुभम धनभर, गौरव जुमडे, बाळूभाऊ भागवत, पंजाब भागवत, प्रकाश धनभर, प्रवीण जामोदे आदी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी मोठ्या संख्येने संताजीभक्त व नागरिक उपस्थित होते.

## जिल्हा परिषद विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय अडगाव बु. येथे

# ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी यशस्वी संपन्न

**दिपक रेळे**
▪**अडगांव बु.,दि १८ (प्रतिनिधी) :**
तेल्हारा तालुका विज्ञान मंडळ तथा तेल्हारा तालुका मुख्याध्यापक संघ जिल्हा परिषद विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय अडगांव बु आणि मौलाना अबुल कलाम आझाद उर्दु हायस्कुल व युनुस अलि कनिष्ठ महाविद्यालय अडगांव बु यांचे संयुक्त विद्यमाने ५३ व्या विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन दिनांक ९ / १२ / ०२५ ते १० / १२ / ० २५ डिसेंबर रोजी करण्यात आले होते.विकसित आत्म निर्भर भारतासाठी या संकल्पनेवर आधारित या विज्ञान प्रदर्शनात विज्ञान प्रात्यक्षिकासह विविध शाळांनी सहभाग नोंदविला . ज्यामध्ये तेल्हारा तालुक्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता



यात विद्यार्थ्यांनी विकसित आलनिर्भर या थिमला अनुसरून ऑटोमॅटिक खत यंत्र ' प्लास्टिक वेस्ट प्रक्रिया यंत्र ' सोलर पॅनल ' इलेक्ट्रिक व्हिकल स्प्रे पंप ' टाकावू पासून टिकावू स्वोलर उर्जा निर्माण पाण्याचे नियोजन , इत्यादी प्रकारचे मॉडल बनवत विधार्थानी स्वतःचा ठसा उमटवला सदर विज्ञान प्रदर्शनाच्या निमित्ताने उद्घघाटन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून शोएब अमिरसाहेब अध्यक्ष मीर ख्याजा उर्दु वेल्फेअर व शिक्षण मंडळ हिवरखेड यांची तर उद्घाटक म्हणून सौ सुनिता तळोकार ( बकाल ) गटशिक्षणाधिकारी पंचायात समिती तेल्हारा यांची उपस्थिती होती.

# लोकस्वातंत्र पत्रकार महासंघाला विदर्भात नवीधार

## राजेश पाटील खारोडे यांची विभागीय संघटक व संपर्कप्रमुखपदी निवड

▪**तेल्हारा,दि १८ (प्रतिनिधी) :**
पत्रकारितेच्या स्वातंत्र्यासाठी, मूल्यांसाठी आणि ग्रामीण-शहरी पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देणाऱ्या लोक स्वातंत्र पत्रकार महासंघाला विदर्भात नवी बळकटी लाभली आहे. तेल्हारा तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तसेच ज्येष्ठ पत्रकार राजेश पाटील खारोडे यांची महासंघाच्या विदर्भ विभागीय संघटक व संपर्कप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

ही नियुक्ती महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय देशमुख यांनी जाहीर केली.राजेश पाटील खारोडे हे गेल्या अनेक वर्षांपासून निर्भीड, प्रामाणिक आणि समाजाभिमुख पत्रकारितेचा आदर्श जपत कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील सामान्य माणसांचे प्रश्न, शेतकरी, कामगार, उपेक्षित



घटकांचे दुःख, प्रशासनातील त्रुटी आणि सामाजिक अन्याय यांना त्यांनी आपल्या लेखणीद्वारे सातत्याने वाचा फोडली आहे. पत्रकारितेसोबतच सामाजिक कार्याची जोड देत त्यांनी अनेक उपक्रमांमधून लोकहिताची भूमिका अधोरेखित केली आहे.त्यांच्या या निवडीमुळे लोक स्वातंत्र पत्रकार महासंघाच्या विदर्भातील संघटनात्मक बांधणीला नवी दिशा व नवा वेग मिळणार असल्याची भावना पत्रकार व सामाजिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे. विदर्भातील पत्रकारांचे प्रश्न, त्यांचे हक्क, सुरक्षितता, सन्मान आणि व्यावसायिक स्वातंत्र्य यांसाठी संघटितपणे आवाज बुलंद करण्याची जबाबदारी पत्रकार राजेश पाटील खारोडे समर्थपणे पार पाडतील, असा विश्वास महासंघाच्या नेतृत्वाने व्यक्त केला आहे.या निवडीचे वृत्त समजताच विदर्भभरातून, विशेषतः अकोला जिल्हा व तेल्हारा तालुक्यातून पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि वाचक वर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेकांनी ही निवड म्हणजे प्रामाणिक पत्रकारितेच्या कार्याची दखल असल्याची भावना व्यक्त केली आहे.राजेश पाटील खारोडे यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वामुळे लोक स्वातंत्र पत्रकार महासंघाची चळवळ अधिक व्यापक, प्रभावी आणि संघर्षशील बनेल, अशी अपेक्षा व्यक्त होत असून त्यांच्या पुढील कार्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## अग्रवाल महिला मंडळाचे संक्रांति प्रदर्शन २० २१ डिसेंबर रोजी अग्रेसन भवन येथे

**अकोला:** स्थानिक अग्रवाल महिला मंडळ व दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे अग्रेसन भवन येथे २० व २१ डिसेंबर २०२५ रोजी संक्रांति प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे . सदर प्रदर्शनात संक्रांतीनिमित्त विशेष उत्पादनांचे स्टॉल सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत जुने अग्रेसन भवन, तिलक रोड अकोला येथे उपलब्ध असणार आहे . महिला व दिव्यांग बांधवांना सहकार्य व्हावे . यासाठी अग्रवाल महिला मंडळ व दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला चे हे विशेष आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजनतर्फे देण्यातआली.

## आम आदमी पार्टी महानगरपालिकेच्या सर्व प्रभागात लढणार!!



▪**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :**
अकोला महानगरपालिकेच्या येणाऱ्या निवडणुकीत आम आदमी पार्टी (आप) शहरातील सर्वच प्रभागांमध्ये आपले उमेदवार उभे करणार असल्याची ठाम घोषणा आज आयोजित पत्रकार परिषदेत आम आदमी पार्टीचे अकोला महानगर ने केली.भाजप व काँग्रेस यांच्या कथित साठगाठीमुळे शहरावर भरमसाठ करांचा बोजा पडला असून, नागरिकांना मूलभूत सुविधांसाठीही संघर्ष करावा लागत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. सत्तेत आल्यानंतर अनावश्यक मनपा कर रद्द करणे व नवीन कर अत्यल्प दरात लागू करणे, हा आम आदमी पार्टीचा प्रमुख अजेंडा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.प्रत्येक प्रभागात आरोग्य, शिक्षण व सुविधा आम आदमी पार्टी सत्तेत आल्यानंतर प्रत्येक प्रभागात ओपीडी हॉस्पिटल दर्जेदार असा विश्वास आम आदमी पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ोमला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# टाळा ऑनलाइन फसवणूक

फिशिंग म्हणजे ऑनलाइन फसवणुकीची सर्वात सामान्य आणि धोकादायक पद्धत. यात गुन्हेगार स्वतःला बँक, कुरिअर कंपनी, सरकारी कार्यालय किंवा अगदी आपल्या ओळखीच्या व्यक्ती आहोत असे भासवतात आणि व्हॉटस ॲप किंवा ईमेलवर अतिशय विश्वासार्ह दिसणारे मेसेज पाठवतात. तुमची केवायसी अपडेट करा, तुमचे पार्सल अडकलेले आहे, तुमचे अकाउंट ब्लॉक होईल, तुम्ही बक्षीस जिंकलेले आहे अशा प्रकारचे हे मेसेज असतात. लोक घाईत लिंक उघडतात आणि नकळत आपले पासवर्ड, बँक तपशील किंवा ओटीपी देतात. काही सेकंदात खाते



रिकामे होऊ शकते.

बहुधा महिलांना अशा प्रकारचे मेसेजेस जास्त येतात. कारण महिला ऑनलाइन शॉपिंग जास्त करतात. त्या घरातील सर्व व्यवहार हाताळतात. अनेकदा कोणाचे तरी ऐकून काही साइट्स उघडतात. फसवणूक करणारे याचा फायदा घेतात. म्हणून सावधानता खूप महत्त्वाची आहे.

टेक्नो टिप्स

सर्वप्रथम हे लक्षात ठेवा की अधिकृत बँका, सरकारी संस्था किंवा विश्वसनीय कंपन्या कधीही व्हॉटस ॲप लिंक्सवरून कोणतीही माहिती मागवत नाहीत. त्यामुळे मेसेजमधील लिंक उघडण्याआधी दोन सेकंद थांबा आणि विचार करा. 'ही कंपनी आपल्याला माहितीतली आहे का?' किंवा ही कंपनी नेहमी संपर्क करण्यासाठी कोणता मार्ग वापरते?' मेसेजचा टोन फार घाईचा, दबाव टाकणारा किंवा धमकी देणारा असेल तर तो बहुतेकवेळा फेक असतो. ईमेलमध्ये स्पेलिंगची चूक, विचित्र पत्ता किंवा जास्त गोड-गोड ऑफर असेल तर तो फिशिंगचा इशारा आहे.

फिशिंगचे अजून एक रूप म्हणजे ओळखीच्या व्यक्तीचे मी अडकलोय, तात्काळ पैसे पाठव. अशा प्रकारचे मेसेजेस. गुन्हेगार आपल्या महितीतल्या किंवा जवळच्या व्यक्तीचा फोटो, नाव किंवा व्हॉट्सॲप डीपी वापरून असे मेसेज पाठवतात. अशा वेळी त्वरित व्हॉइस कॉल करून खात्री करा. आवाज वेगळा असेल तर लगेच ब्लॉक करा. आपला ओटीपी, यूपीआय पिन, पासवर्ड, डेबिट कार्ड याची माहिती कोणालाही देऊ नका. ती व्यक्ति बँकेतून बोलत असल्याचा दावा करत असली तरी काळजी घ्या. अशा गुन्हेगारांची बोलण्याची शैली खूप आत्मविश्वासपूर्ण असते. परंतु दबावाखाली येऊ नका. सोशल मीडियावर जास्त वैयक्तिक माहिती शेअर करू नका. वाढदिवस, घराचा पत्ता, मुलांची नावे यासारखी माहिती गुन्हेगार अतिशय विश्वासार्ह मेसेज तयार करण्यासाठी वापरतात. थोडा संयम, थोडी जागरूकता आणि थोडी शंका हीच सर्वात मोठी सुरक्षा आहे. योग्य खबरदारी घेतली तर फिशिंगपासून स्वतःला आणि कुटुंबाला सुरक्षित ठेवता येते हे नक्की.

# अस्मिता

**१९८६ मध्ये मल्लिका यांनी आपल्या कुटुंबाच्या ट्रॅक्टर अँड फार्म इक्विपमेंट लिमिटेड या कंपनीत काम करायला सुरुवात केली. त्या काळी ट्रॅक्टर उद्योग हा पुरुषप्रधान मानला जाई. पण मल्लिका यांनी या संकल्पनेला जणू आव्हान दिले आणि तंत्रज्ञान, नवकल्पना, ग्राहकांची गरज समजून घेऊन तंत्रज्ञान, ग्राहक सेवा आणि उत्पादन प्रक्रियेत सुधारणा केली.**

## ट्रॅक्टर क्वीन




मल्लिका श्रीनिवासन यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९५९ रोजी चेन्नई, भारत येथे झाला. उद्योजक घराण्यात जन्म झाल्यामुळे लहानपणापासूनच उद्योग आणि व्यवसायाचा अनुभव त्यांच्या जीवनाचा भाग होता. मल्लिका यांचे वडील ए सिवासैलम हे औद्योगिक क्षेत्रात काम करत होते. मल्लिका अत्यंत बुद्धिमान होत्या. चेन्नईतील वूमन्स ख्रिश्चन कॉलेजमधून त्यांनी गणितात पदवी मिळवली. नंतर चेन्नई विद्यापीठातून इकॉनॉमेट्रिक्समध्ये पोस्टग्रॅज्युएशन केले आणि सुवर्णपदक मिळवले. अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया येथील व्हार्टन स्कूल ऑफ बिझिनेस मध्ये त्यांनी एमबीए केले. मल्लिका सांगतात, त्यावेळी त्यांचे बाळ अगदी लहान होते त्यावेळीही त्या बाळासह लॉन्ड्री रूममध्ये जाऊन बसत आणि एमबीएचा अभ्यास करत असत.

१९८६ मध्ये मल्लिका यांनी आपल्या कुटुंबाच्या ट्रॅक्टर अँड फार्म इक्विपमेंट लिमिटेड म्हणजेच TAFE या कंपनीत काम करायला सुरुवात केली. तेव्हा कंपनीची उलाढाल फारच कमी होती. परंतु मल्लिका यांच्या दूरदृष्टी आणि मेहनतीमुळे कंपनीत मोठे बदल घडले. त्या काळी ट्रॅक्टर उद्योग हा पुरुषप्रधान मानला जाई. पण मल्लिका यांनी या संकल्पनेला जणू आव्हान दिले आणि तंत्रज्ञान, नवकल्पना, ग्राहकांची गरज समजून घेऊन तंत्रज्ञान, ग्राहक सेवा आणि उत्पादन प्रक्रियेत सुधारणा केली. २००५ मध्ये त्यांनी धाडसी पाऊल उचलले आणि आईशर मोटर्स या कंपनीचा ट्रॅक्टरविभाग खरेदी केला. त्यामुळे TAFE भारतात दुसऱ्या क्रमांकाची ट्रॅक्टर उत्पादक कंपनी बनली. त्यानंतर TAFE ने केवळ ट्रॅक्टर्सच नव्हे, तर डिझेल इंजिन्स, जनरेटर, हायड्रॉलिक पंप, ट्रॅक्टर पार्ट्स, कृषी मशीनरी, वाहने अशी उत्पादने तयार केली.

मानिनी

मल्लिका यांना ट्रॅक्टर उद्योगात मिळवलेल्या यशामुळे 'ट्रॅक्टर क्वीन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाते. त्यांच्या नेतृत्वाखाली कंपनीने उत्पादन, ब्रँड विस्तार, निर्यात आणि नवीन कृषी उपकरणांमध्ये गुंतवणूक केली. आज TAFE ने जगभरात ओळख मिळवली आहे. मल्लिका यांचा प्रवास फक्त व्यवसायापुरता मर्यादित नाही. त्यांचा शिक्षण, ग्रामीण विकास, आरोग्य, आणि समाजसेवा क्षेत्रातही मोठा सहभाग आहे. शंकरा नेत्रालय, कर्करुग्ण संस्था, ग्रामीण शाळा यासारख्या संस्थांनाही त्यांची मदत आणि सहकार्य असते. त्यांचे नेतृत्व, चिकाटी आणि दूरदृष्टी सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. स्त्री असूनही पुरुषप्रधान उद्योगात यश मिळवता येते हे मल्लिका यांनी सिद्ध केले आहे. उत्तम यशासाठी योग्य नियोजन, मेहनत व धैर्य यांची गरज आहे असे मल्लिका अभिमानाने सांगतात.

# पुन्हा घडी बसवताना...

मातृत्व किंवा काही कारणामुळे सगळंच बंद होतं. मग मूल थोडं मोठं झाल्यावर थांबलेलं आयुष्य हळूहळू का होईना गतीमान होऊ लागतं. दरम्यानच्या काळात पूर्णवेळ घरी असल्यामुळे रूटीन बदलून गेलेलं असतं. पण आता दैनंदिन आयुष्याची ही घडी बसवायला हवी. यासाठी थोडा वेळ लागणार असला तरी तुम्ही ते नक्कीच साध्य करू शकता. पुन्हा नव्याने दिनक्रम कसा सुरू करायचा? जाणून घेऊ या.



लाईफस्टाईल

* तुमचा दिनक्रम म्हणजे कोणतीही स्पर्धा नाही हे आधी लक्षात घ्या. त्यामुळे घाई करू नका. टप्प्याटप्प्याने पुढे जा. मी उद्यापासून सकाळी सहा वाजता उठणार असं म्हणण्यापेक्षा डॉक्टारांच्या सल्ल्याने थोडा व्यायाम सुरू करा. व्यायामाचा कालावधी हळूहळू वाढवत न्या. तुम्हाला रूटीन का बसवायचं आहे हे आधी जाणून घ्या. नेहमीची कामं सुरू करण्याआधी स्वत:ला रिचार्ज करा.

* एखाद्या वहीमध्ये तुमची उद्दिष्टं नमूद करून ठेवा. तुम्हाला काय करायचं आहे, हे आधी ठरवा. तुमच्यापैकी काही जण दररोजच्या वेळा ठरवून त्यानुसार काम करतील तर काही आठवड्याभराच्या कामांची यादी करतील.

* दिनक्रम ठरवल्यानंतर वेळा जुळवण्याचा प्रयत्न करा. अन्यथा तुमच्या वेळापत्रकाला काहीच अर्थ उरणार नाही.

* अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या वेळापत्रकाला जीवनमरणाचा प्रश्न बनवू नका. प्रत्येक तासाचा हिशेब ठेवून वागू नका. आयुष्य आनंदाने जगा.

# बिनधास्त खा सुकामेवा!

निरोगी आयुष्य जगण्यासाठी तसंच रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी सकस अणि पोषक आहार घ्यायला हवा. भाज्या, फळं, सुकामेवा तसंच इतर धान्यांमधून शरीराला विविध प्रकारचे पोषक घटक मिळतात. त्यामुळे आहारात या सर्व घटकांचा समावेश करायला हवा. आहारात या सर्व घटकांचा समावेश करण्यासोबतच ते योग्य प्रकारे खाणंही तितकंच आवश्यक आहे. प्रमाण आणि पद्धत या दोन गोष्टींचा समतोल योग्य प्रकारे राखला तर आहार परिपूर्ण होतो. विविध घटकांमधल्या पोषणमुल्यांची माहिती आपल्याला असायला हवी. त्यातही सुकामेवा सर्वांचा आवडता. बदाम, पिस्ते पटकन तोंडात टाकले जातात. सुक्यामेव्यामुळे शरीराला होणाऱ्या लाभांबाबतही आपण बरंच ऐकलं आणि वाचलं आहे. म्हणूनच बदाम, आक्रोड, काजू, मनुका, बेदाणे, सुकं अंजीर यांचा विविध प्रकारे आहारात समावेश केला जातो. बाजारात विविध प्रकारचा सुकामेवा मिळतो. त्यापैकी साधे किंवा खारवलेले या प्रकाराशी आपली ओळख असते. या दोहोंमधून कोणत्या प्रकारच्या ड्रायफ्रुट्सची निवड करावी जेणेकरून त्यांची पोषणमुल्यं शरीराला सहजतेनं मिळतील याविषयी...

डाएट मंत्रा

काजू, पिस्ता, बदाम, आक्रोड, शेंगदाणे अशा मेव्यांमधे अँटीऑक्सिड्ट, फायबर, ओमेगा-३, प्रथिनं, जीवनसत्त्वं, अशा घटकांनी परिपूर्ण आहेत. खारवलेला मेवा आणि साध्या प्रकारचा मेवा यामध्ये कोणाची पोषणमुल्यं जास्त चांगली यावर शास्त्रज्ञांनी संशोधन केलं असता असं आढळून आलं की, खारवलेला आणि साधा मेवा या दोहोंमध्येही सारख्या प्रमाणात पोषणमूल्यं असतात. त्यामुळे मेवा साधा असो वा खारवलेला, निर्धास्त होऊन खा !



# कानांच्या आरोग्यासाठी...

आरोग्याकडे लक्ष देताना कानांकडे मात्र आपलं दुर्लक्षच होतं. कानात खाज येणं, मळ साचणं या बाबी किरकोळ समजल्या जातात. पण प्रत्यक्षात तसं नसतं. कानासारख्या अत्यंत महत्त्वाच्या अवयवाकडे होणारं दुर्लक्ष चांगलंच महागात पडू शकतं. अगदी बहिरेपणाही येऊ शकतो.



कानातल्या मळामुळे बऱ्याच समस्या निर्माण होतात. म्हणूनच हा मळ वेळच्या वेळी काढून टाकायला हवा. शिवाय तो योग्य पद्धतीने काढणंही आवश्यक आहे. कानातल्या मळामुळे जंतूसंसर्ग होऊ शकतो. मळ काढताना थोडी जरी चूक झाली तर रक्तस्रावही होऊ शकतो. यामुळे कानाचा पडदा फाटून कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. लहान मुलांच्या कानांची विशेष काळजी घ्यायला हवी. कानांमध्ये वेदना किंवा इतर काही समस्या जाणवल्या तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

आरोग्यवेध

कान खाजणं, वेदना होणं, कानांतून पाणी येणं, भोवळ येणं, अशक्तपणा, कमी किंवा अजिबात ऐकू न येणं, कानाला दडी बसणं, रक्त येणं, ताप येणं, चालताना तोल जाणं, अशा त्रासांकडे दुर्लक्ष करू नका. ही कानांशी संबंधित एखाद्या आजाराची लक्षणं असू शकतात.

कानांचा संसर्ग टाळण्यासाठी स्वच्छता खूप महत्त्वाची आहे. आंघोळीदरम्यान कानांमध्ये पाणी जाऊ शकतं. कानात पाणी जाऊ देऊ नका. आंघोळीनंतर कानही स्वच्छ करा. सेफ्टी पिना, काडेपेटीची काडी, टूथ पिकने कान स्वच्छ करू नका. ईयर बड्सच्या अतिवापरामुळे संसर्गाचा धोका वाढतो. त्याऐवजी टॉवेल थोडा ओला करून कान स्वच्छ करून घेता येईल. मळ काढण्यासाठी ड्रॉप्स घालता येतील. कानात सतत हेडफोन्स घातल्यामुळे मळाला अवरोध निर्माण होता. यामुळे मळ कानातच अडकून बसू शकतो. तसंच हेडफोन्सवर मोठ्या आवाजात गाणी ऐकल्यामुळे पडदा फाटू शकतो. त्यामुळे हे सगळं टाळा.

# कुरकुरीत ब्रोकोली चीज बॉल्स

कानामागून आली आणि तिखट झाली असं काहीसं घडलं ब्रोकोलीबाबत! हिरव्या रंगाची, फ्लॉवरसारखी दिसणारी भाजी म्हणजे ब्रोकोली. भारतामध्ये ब्रोकोलीचा वापर चांगलाच वाढला आहे. एक पोषक भाजी म्हणून ब्रोकोलीला अनेकींच्या स्वयंपाकघरात स्थान मिळालं आहे. सॅलड, भाजी किंवा सूप अशा वेगवेगळ्या प्रकारांमार्फत ब्रोकोलीचा आस्वाद घेता येतो. तंदूर ब्रोकोली हा प्रकारही मस्त लागतो. ब्रोकोली चीज बॉल्स ही वेगळी डिश वेगळ्या चवीचा अनुभव देऊन जाईल आणि यानिमित्ताने ब्रोकोलीही पोटात जाईल. चला तर मग सुरूवात करू या.



रसगंधा

**साहित्य–** बारीक चिरलेली एक कप ब्रोकोली, मॉजरेला चीजचे दहा क्युब्ज, बारीक चिरलेला एक कप कांदा, एक चमचा तेल, बारीक चिरलेला एक चमचा लसूण, दोन चमचे बारीक चिरलेली हिरवी मिरची, दोन चमचे कॉर्नफ्लोर, उकडून बारीक कुस्करलेले तीन ते चार कप बटाटे, डीप फ्राय केलेले ब्रेड क्रम्स, चवीनुसार मीठ.

**कृती–** एका कढईमध्ये चिरलेला कांदा, लसूण आणि हिरव्या मिरचीचे तुकडे टाकून दोन मिनिटांपर्यंत परतून घ्या. त्यानंतर त्यात ब्रोकोली घालून चार मिनिटांपर्यंत शिजवत रहा. संपूर्ण शिजल्यानंतर हे मिश्रण कढईतून उतरवून ठेवा. मिश्रण गार झाल्यानंतर यात बटाटे, कॉर्नफ्लोर आणि मीठ घाला. या मिश्रणाचे दहा वेगवेगळे भाग करा. या भागांचे गोळे करून घ्या. गोळ्यांच्या मधोमध दाब देऊन एक चीज क्युब खोचा. हे बॉल्स ब्रेड क्रम्समधे लपेटून घ्या. एका कढईमध्ये तेल घेऊन लालसर होईपर्यंत हे बॉल तळून घ्या. चटणीसोबत सर्व्ह करा.

# सौंदर्यवर्धनासाठी कॉफी



एक कप कॉफी प्यायली की कसं अगदी ताजंतवानं वाटतं. जगभरात कॉफीच्या चाहत्यांची कमी नाही. कॉफीचा तो सुगंध दरवळाला की कॉफीवेड्याला रहावत नाही. कॉफीचे अनेक ब्रँड्स लोकप्रिय आहेत. तर अशी ही कॉफी फक्त पिण्यासाठीच योग्य आहे असं नाही तर त्या व्यतिरिक्तही कॉफीचे बरेच फायदे आहेत. कॉफी त्वचेसाठी अत्यंत गुणकारी मानली जाते. कॉफीच्या सेवनाने लाभ होतातच पण कॉफीचा वापर सौंदर्यवर्धनासाठीही करता येतो. याविषयी...

सौंदर्यसाधना

* फेशियल स्क्रब म्हणून कॉफीचा उपयोग केला जातो. कॉफीचे कण त्वचेतील मृत कोशिकांना हळूवारपणे दूर करतात. कॉफी स्क्रब बनवणं अगदी सोपं आहे. एक चमचा कॉफीमध्ये थोडं ऑलिव्ह ऑईल मिसळा की झालं स्क्रब तयार ! हे स्क्रब त्वचेवर हलक्या हाताने चोळा. सर्व मृत पेशी निघून जातील.

* केसांच्या मुळाशी असलेल्या मृत कोशिकांमुळेही त्रास होऊ शकतो. टाळूवरील त्वचेच्या स्वच्छतेविषयी खूप काही बोललं जात असलं तरी त्याकडे तितकं लक्ष दिलं जात नाही. याच कारणास्तव केस कोरडे होतात आणि कोंड्याच्या प्रमाणातही वाढ होते. टाळूवरील मृत कोशिकांचं प्रमाण कमी करण्यासाठी कॉफीचे कण या त्वचेवर घासावेत. त्याने डोक्याच्या त्वचेवरील मृत कोशिका निघून जातात. अर्थात टाळूवरील त्वचा खूप नाजूक असल्यामुळे ही कृती हलक्या हातांनी करायला हवी.

* अतिथकव्याने बरेचदा डोळे सुजतात. अशा वेळी आईस ट्रेमध्ये कॉफीमिश्रित पाणी घाला. ते फ्रीजमध्ये सेट व्हायला ठेवून द्या. या बर्फाने सूज आलेल्या भागावर शेक द्या.यामुळे डोळ्यांची सूज उतरेल आणि डोळ्यांना थंडावा मिळेल.

हेअर आणि केयर



## दुधाने सरळ करा केस!

हेअर स्ट्रेटनिंगची चांगलीच चलती आहे. पण स्ट्रेटनिंग ब्रश किंवा मशीनने सरळ केलेले केस कमकुवत होण्याचा धोका असतो. मात्र केस सरळ करण्यासाठी दुधाचा वापर केल्यास त्यांचं आरोग्य टिकून राहू शकतं. यासाठी एक तृतीयांश पाण्यात थोडंसं दूध टाकून आंघोळीच्या आधी एक तास केसांवर स्प्रे करावं. यानंतर केस विंचरून घ्यावेत. एक तासाने केस धुवून घ्या. पुढच्या वेळी शँपू करेपर्यंत केस सरळ राहतात.

ट्रेंडी स्टाईल

## पिअर्सिंग करताय?

सध्या बाजारात ट्रेंडी नोझरिंग्ज पहायला मिळतात. यासोबतच नखरेल नथीही आहेतच. हे सगळं घालण्यासाठी नाक टोचायला हवं. चापाच्या नोझरिंग्ज मिळत असल्या तरी टोचलेल्या नाकात नथ घालण्याची बात ही कुछ और है. नाक टोचण्याचा विचार करत असाल तर तुम्हाला काही टिप्स फॉलो कराव्या लागतील. संसर्गाचा धोका टाळण्यासाठी नाक नेहमी तज्ज्ञ व्यक्तीकडून टोचून घ्या. नाक टोचलेल्या भागाची विशेष काळजी घ्यावी लागते. अधिक जपावं लागतं. यासाठी भरपूर पाणी प्या. पाण्यामुळे शरीरातले विषारी घटक निघून जातील. सुरूवातीला सोनं किंवा चांदीची चमकी घाला.



किचन क्वीन

## आगळ्या चवीचे नूडल्स

नूडल्स म्हटलं की आपल्या तोंडाला पाणी सुटतं. पण एकाच पद्धतीचे आणि चवीचे नूडल्स खाऊन कंटाळा येतो. अशा वेळी चवीत थोडा बदल केल्यास नूडल्स आवडीने खाल्ले जातात. लेमन ग्रास, लिंबाची पानं टाकून नूडल्सला वेगळी चव देता येते. नूडल्समध्ये सजावटीसाठी भाजलेले दाणे किंवा बदामाचे कापही घालता येतात.



# मोबाइल डिजिटल स्किल्स

आआजच्या काळात मोबाईल डिजिटल स्किल्स हा महिलांच्या कौशल्य विकासाचा सर्वात परिणामकारक आणि सहज उपलब्ध मार्ग ठरतो आहे. कारण मोबाईल हा प्रत्येकीकडे असतोच. पण बहुतेक वेळा त्याचा वापर प्रामु'याने कॉल, फोटो किंवा व्हॉटसॲप पुरतामर्यादित असतो. हा मोबाईल थोडा वेगळ्या पद्धतीने वापरता आला तर तो महिलांसाठी शक्ती, स्वयंपूर्णता आणि कमाईची मोठी संधी बनू शकतो. मोबाईल स्किल्स शिकल्यावर महिलांना कामासाठी वेगळी साधने किंवा जादा वेळ काढण्याची गरज पडत नाही. घरकामाच्या मधल्या वेळेतच त्या छोटे व्हिडिओ बनवू शकतात. पोस्ट तयार करू शकतात. रिसेलिंगचे काम करू शकतात किंवा ऑनलाइन क्लास घेऊ शकतात.

स्किल डेव्हलपमेंट

अशा प्रकारे मोबाईल हे त्यांचे स्वतःचे छोटे ऑफिस बनू शकते. आज अनेक महिला व्हॉटस ॲप बिजनेसवरून घरगुती उत्पादने विकतात. कॅन्व्हा वापरून पोस्टर्स किंवा इनव्हिटेशन तयार करून कमाई करतात किंवा सोशल मीडियावर छोटा व्यवसाय सुरू करतात. हे सर्व त्यांना मोबाईल स्किल्समुळे शक्य होते.

मोबाईल डिजिटल स्किल्स महिलांना फक्त कमाईचे साधन देत नाहीत, तर त्यांना रोजच्या जीवनातही अधिक सक्षम बनवतात. ऑनलाइन बिलेभरणे, बँकिंगची कामे करणे, सरकारी फॉर्म भरणे, मुलांच्या शाळेचे ॲप्स वापरणे हे सर्व त्या स्वतः करू शकतात. त्यामुळे दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची गरज राहत नाही. अर्थातच त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. आजच्या डिजिटल जगात सुरक्षितताही महत्त्वाची आहे. मोबाईल स्किल्समुळे फिशिंग, फेक मेसेज, ओटीटी स्कॅमपासून दूर राहण्याची जागरूकता वाढते. त्यामुळे महिला अधिक सुरक्षितपणे इंटरनेट वापरू शकतात. फोटो एडिटिंग, ईमेल, व्हिडिओ कॉल्स, ऑनलाइन पेमेंट्स, दस्तऐवज पीडीएफमध्ये बदलणे या गोष्टी मोबाईलवर करता आल्या तर महिला घरी बसूनही प्रोफेशनल पद्धतीने काम करू शकतात. मोबाईल डिजिटल स्किल्सचे वैशिष्ट्य म्हणजे हे कौशल्य विद्यार्थिनींपासून गृहिणींपर्यंत आणि उद्योजिकांपासून नोकरी करणाऱ्या महिलांपर्यंत कुणालाही शिकता येते. त्यासाठी वयाची किंवा पार्श्वभूमीची मर्यादा नाही. त्यासाठी क्लास, ऑफिस किंवा महागडी उपकरणे लागत नाहीत. मोबाईल कुठेही आणि कधीही वापरता येतो. त्यामुळे आपली सर्व नेहमीची कामे सांभाळून मोबाईलवर कामे करता येतात. मोबाईल डिजिटल स्किल्स शिकणे म्हणजे स्त्रियांना स्वतःच्या प्रगतीचे साधन त्यांच्या हातात देणे. त्यातून त्यांना स्वयंपूर्णता, सुरक्षा, आत्मविश्वास आणि कमाई सर्व काही मिळते.

# महसूल विभागासाठी स्वतंत्र डाटा सेंटर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
छोट्या-छोट्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांची किंवा सर्वसामान्य नागरिकांची कामे रखडता कामा नयेत, असे सक्त निर्देश देत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाच्या तांत्रिक सक्षमीकरणाचा मोठा निर्णय जाहीर केला.

महसूल विभागासाठी स्वतंत्र डाटा सेंटर उभारण्याची आणि विभागाच्या संपूर्ण डिजिटल प्रणालीचे आधुनिकीकरण करण्याची घोषणा त्यांनी गुरुवारी झालेल्या बैठकीत केली.

बावनकुळे म्हणाले, जमिनीशी संबंधित डाटा अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा आहे. त्याची सुरक्षितता सर्वोच्च प्राधान्याची असून महसूल विभागाला देशात पहिल्या क्रमांकावर नेण्यासाठी अत्याधुनिक तांत्रिक यंत्रणा उभारली पाहिजे. यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पूर्ण तयारीत राहावे.

राज्यातील शेतकरी आणि नागरिकांना जमिनीशी संबंधित सर्व कामे घरबसल्या, सुलभ आणि विनासायास करता यावीत, यासाठी महसूल विभागाचे संपूर्ण डिजिटलायझेशन आणि आधुनिकीकरण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**उच्चस्तरीय बैठकीत महत्त्वाचे निर्णय**

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या दालनात ही उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीस महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे, नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे यांच्यासह महसूल व आयटी विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



**राज्याची सर्व जमीन डाटा सेंटरवर येणार**

बावनकुळे यांनी सांगितले की, राज्याच्या कानाकोपऱ्यातील जमिनींची मोजणी आणि नोंदी अद्ययावत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. सध्या ई-फेरफार, ई-मोजणी २.०, ई-पीक पाहणी, महाभूमी पोर्टल यांसह ५५ पेक्षा अधिक ॲप्लिकेशन्स महसूल यंत्रणेमार्फत वापरात आहेत.

भविष्यात संपूर्ण राज्याची जमीन एकाच डाटा सेंटरवर आणण्याचा निर्णय असल्याने, या प्रणालीत कोणताही तांत्रिक बिघाड खपवून घेतला जाणार नाही, असे त्यांनी सांगितले. भूसंपादन तसेच इतर महसूलविषयक कामे जलदगतीने आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी हे आधुनिकीकरण काळाची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

**नागपूरला डिझास्टर डाटा सेंटर**

माहितीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. सध्या नवी मुंबईतील ऐरोली येथे डाटा सेंटर कार्यरत आहे. मात्र नैसर्गिक आपत्ती किंवा तांत्रिक अडचणी उद्भवल्यास कामकाजात खंड पडू नये, यासाठी डिझास्टर रिकव्हरी साईट अधिक सक्षम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने नागपूर येथे अत्याधुनिक डिझास्टर डाटा सेंटर कार्यान्वित करण्यात येणार असून, मुंबईतील विद्यमान डाटा सेंटरचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी महसूल विभागाला आयटी विभागाच्या माध्यमातून आवश्यक जागा व तांत्रिक सहकार्य उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

महसूल विभागाच्या या निर्णयामुळे शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, जमिनीचे व्यवहार अधिक सुरक्षित, जलद आणि पारदर्शक होणार आहेत.

## बिबट्याच्या हल्ल्यात मजुराचा मृत्यू



### वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात यावर्षी ४५ बळी

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि.१८ :
ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या मोहर्जी वनपरिक्षेत्रातील पद्मापूर-१ बिटात गुरुवार १८ डिसेंबर रोजी सकाळी साहजू चमरू बिलठेरिया (६३) या बांबू कटाई करीत असलेल्या मजुरावर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात मजुराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात यावर्षी आतापर्यंत ४५ जणांनी जीव गमावला आहे.

मध्य प्रदेशातील मंडला जिल्ह्यातील प्रतला गावातील रहिवासी असलेला हा मजूर येथे कामाला होता. गुरुवारी सकाळी ८.३० वाजताचे सुमारास अडेगाव गावालगत कक्ष क्रमांक १८१ मध्ये बांबू कटाईचे कामे करीत असतांना बिबट्याने हल्ला केला. यात त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती प्राप्त होताच संतोष थिपे, वनपरिक्षेत्र अधिकारी, मोहर्ली (प्रादे.), व संदीप एकाडे, पोलीस निरीक्षक व त्यांची टीम, पोलीस स्टेशन दुगार्पूर तसेच वनपाल व क्षेत्रीय वनरक्षक यांचे सोबत पोलीस पंचनामा व मौका पंचनामा करून मृतकाचे शव शवविच्छेदन करण्याकरिता जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर येथे नेण्यात आले. मृताच्या नातेवाईकांना तात्काळ मदत म्हणून ५० हजार रुपये देण्यात आले. सदर परिसरात कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले असून सदर घटनेचा पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी मोहर्ली हे करीत आहेत.

## भाजपात गटबाजी : इच्छुकांच्या मुलाखती थांबवण्याची पाळी

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि.१८ :
आगामी महापालिका निवडणुकीसाठी आज, गुरुवारी भारतीय जनता पक्षतर्फे इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती स्थानिक एन.डी. हॉटेल येथे मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखती पक्ष निरीक्षकांच्या उपस्थितीत सुरू असताना अचानक मुलाखती थांबविण्यात आल्या. आता पुढील मुलाखती शुक्रवारी बुरडकर सभागृहात होतील असे सांगण्यात आल्याने एकच गोंधळ उडाला. भाजप मधील गटबाजीमुळेच या मुलाखती अर्ध्यात थांबविण्यात आल्या अशी चर्चा आता सुरू आहे.

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. भाजपने आज गुरुवारपासून मुलाखतीचे सत्र सुरू केले. भाजपकडून निरीक्षक म्हणून आलेले चैनसुख संचेती यांच्या उपस्थितीत ही मुलाखत प्रक्रिया सुरू होती. आमदार किशोर जोरगेवार तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते हंसराज अहिर, माजी उपमहापौर राहुल पावडे यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, मुलाखती सुरू असतानाच सायंकाळी पाच वाजल्यानंतर अचानक मुलाखती थांबवण्यात आल्या. उपस्थित इच्छुक उमेदवार व कार्यकर्त्यांना पुढील मुलाखती बुरटकर सभागृह येथे घेतल्या जातील, अशी माहिती देण्यात आली. यामुळे एकच गोंधळ उडाला. या संपूर्ण प्रकारामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त करण्यात आला.

## बटोगे तो फसोगे; भाजपच्या आमदाराकडून नवीन नारा

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि.१८ :
भंडारा नगर परिषदेच्या दोन जागांसाठी २० डिसेंबरला मतदान होणार असल्याने प्रचाराला वेग आला आहे. भंडारा येथील नगरपालिका निवडणुकीपूर्वी भाजपने नवीन निवडणूक घोषणा देऊन राजकीय वातावरण तापवले आहे.

भाजप नेते आणि आमदार परिणय फुकेने यांनी प्रचार सभेत बटोगे तो फसोगे.. असा नवा नारा देत इतर पक्षांच्या दिशाभूल करणाऱ्या आश्वासनांना आणि बनावट उमेदवारांना फसवू नका असे आवाहन केले.

मात्र आमदार फुके यांचे हे वक्तव्य भावना भडकावणारे असून जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करणारी असल्याचा आरोप करीत निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी अशी मागणी माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) जिल्हाध्यक्ष चरण वाघमारे यांनी पत्रकार परिषदेतून केली आहे.

न्यायालयीन प्रकरणांमुळे निवडणूक स्थगित झालेल्या नगरपालिका अध्यक्ष व सदस्य पदांसाठी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. भंडारा नगर पालिका क्षेत्रातील दोन प्रभागांमधील दोन गटाची निवडणूक पुढे ढकलली होती. प्रभाग १२ अ व १५ अ साठी २० डिसेंबर रोजी ही निवडणूक होणार आहे. या अनुषंगाने प्रचाराची मोहीम अजूनही सुरू आहे.

भाजप नेते आमदार फुके यांच्या एका वक्तव्यानंतर मात्र राजकीय वातावरण आणखीनच तापले. विकासासाठी भाजपाच्या उमेदवाराला विजयी करा, असे आवाहन भाजपा नेते परिणय फुके यांनी केले.

दरम्यान आज पत्रकार परिषद घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चरण वाघमारे यांनी आमदार फुकेंच्या या वक्तव्यावर तीव्र आक्षेप नोंदवला. ते म्हणाले की, भाजपने विधानसभा निवडणुकीच्या वेळी देखील हीच खेळी खेळली होती. जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करण्याचे काम भाजप करत आहे. अशा प्रकारच्या वक्तव्याने केली कुणबी असा जातीयवाद निर्माण होऊ शकतो असे चरण वाघमारे म्हणाले. याप्रकरणी निवडणूक निर्णय अधिकारी आणि आयोगाने कारवाई करण्याची मागणही वाघमारे यांनी केली आहे.

## रस्त्यावर आढळले बिबट्याचे शावक

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि.१८ :
अकोला जिल्ह्यात सुद्धा अनेक ठिकाणी बिबट्याचे दर्शन झाले. त्यातच आता जिल्ह्यातील कसुरा मार्गावर बिबट्याचे शावक दिसून आले.

या घटनेची माहिती मिळताच अकोला वन विभागाने घटनास्थळावर धाव घेऊन त्या बिबट्याच्या शावकाला ताब्यात घेतले आहे. सध्या शावकाला वन विभागाच्या कार्यालयात पिंजऱ्यामध्ये सुरक्षित ठेवण्यात आले.



मौजा कसुरा मार्गावरील गजानन महाराज मंदिराजवळील पेट्रोल पंम्पाच्या समोर सुमारे १०० मीटर अंतरावर डाबरी रस्त्यावर वन्यप्राणी बिबट्याचे शावक बसून असल्याचे दिसले. वनमाल जी. पी. गायकवाड व त्यांच्या अधिनिस्त कर्मचारी शासकीय वाहन घेऊन घटनास्थळी तत्काळ पोहोचले. बिबट्याच्या शावकाला वन कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतले.

## लोकरंजन

### ६ फेब्रुवारीला लागणार 'लग्नाचा शॉट'




लग्न म्हणजे आनंद, उत्साह आणि तयारीह्वपण कधी कधी हाच आनंद गोंधळात बदलला तर? अशाच एका गोंधळावर आधारित ह्यलग्नाचा शॉटह्व हा चित्रपट ६ फेब्रुवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे..

नुकतेच या चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित झाले असून त्यातून चित्रपटाचा हलकाफुलका, मजेशीर मूड स्पष्टपणे दिसून येतो. चित्रपटाच्या नावावरूनच हा प्रकार काहीसा वेगळा आणि धमाल असणार, याची कल्पना येते. लग्नाच्या धावपळीमध्ये घडणाऱ्या अनपेक्षित गोष्टी, चुकीचे अंदाज, गैरसमज आणि त्यातून निर्माण होणारा गोंधळ याभोवती या चित्रपटाची गोष्ट फिरते. मात्र, हा गोंधळ कोणता आहे आणि लग्नाचा शॉट नेमका काय आहे, हे चित्रपट पाहिल्यावरच उलगडणार आहे.

सध्यातरी या चित्रपटात कोणाचे चेहरे झळकणार हे गुलदस्त्यात असले तरी हा चित्रपट धमाल करणार हे नक्की! महापर्व फिल्म्स निर्मित, जिजा फिल्म्स यांच्या सहयोगाने प्रेक्षकांच्या भेटीला या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अक्षय गोरे यांनी केले असून या चित्रपटाला प्रवीण कोळी आणि योगिता कोळी यांचे संगीत लाभले आहे. अक्षय महादेव गोरे, विजय महादेव गोरे, अभिषेक उत्कर्ष कोळी आणि सुरेश मंगललाल प्रजापती या चित्रपटाचे निर्माते आहेत. ■ ■

### क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यमचा संगीत अनावरण सोहळा



क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम चित्रपटातील पहिलं गाणं शाळा मराठीला प्रेक्षकांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादानंतर आता दुसरं गीत स्वर्गात आकाशगंगा हे शाळेतल्या आठवणींना उजाळा देणारं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे.

या गाण्याचा अनावरण सोहळा अगदी आगळ्या-वेगळ्या पद्धतीने अभिनव ज्ञानमंदिर प्रशालेतील पटांगणात पार पडला. या शाळेत गाण्याचं अनावरण करण्याचं कारण म्हणजे चित्रपटाचे दिग्दर्शक हेमंत ढोमे यांचं या शाळेशी असलेलं अतूट आणि गोड नातं. त्यांच्या विद्यार्थीदशेतील अनेक आठवणी या शाळेशी जोडल्या असून हेमंत यांनी पहिल्यांदा नाटकात काम केलं ते याच शाळेच्या मंचावर.

त्यामुळे त्यांच्यासाठी हा एक जिव्हाळ्याचा सोहळा असून शाळेला दिलेली एक मानवंदना आहे. यावेळी क्षिती जोग, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, हरीश दुधाडे, पुष्कराज चिरपुटकर, कादंबरी कदम यांच्यासह गायक रोहित राऊत, जुईली जोगळेकर, संगीतकार हर्ष- विजय उपस्थित होते. या खास सोहळ्यात चित्रपटातील कलाकार हजारो विद्यार्थ्यांसोबत गाण्यावर थिरकले. विद्यार्थ्यांची ऊर्जा आणि मैदानात दुमदुमलेलं आनंदी वातावरण यामुळे हा गाण्याचा अनावरण सोहळा धमाकेदार ठरला. शिक्षक, विद्यार्थी आणि चित्रपटाची टीम सगळ्यांनी मिळून हा क्षण संस्मरणीय बनवला. ■ ■ ■

### लग्न पंचमी नाटकातून अमृता खानविलकरचं रंगभूमीवर पदार्पण



प्रेक्षकांना मोहित करणारी अभिनेत्री म्हणजे अभिनेत्री अमृता खानविलकर. आजवर तिने सिनेमा, मालिका, ओटीटी या प्रत्येक माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं पण वर्ष संपताना अमृता प्रेक्षकांना एक खास सर्प्राइज देणार आहे ते म्हणजे अमृता खानविलकर लवकरच एका नव्या कोऱ्या नाटकातून रंगभूमीवर काम करताना दिसणार आहे.

अमृता लग्न पंचमी या नाटकातून रंगभूमीवर पदार्पण करणार असून लवकरच हे नाटक प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचं कळतंय. काही दिवसांपूर्वी अमृताने तिच्या वाढदिसानिमित्त सोशल मीडिया वर एक पोस्ट लिहून येणाऱ्या वर्षात काहीतरी मनाच्या अगदी जवळ असलेला प्रोजेक्ट घेऊन येणार असल्याची माहिती दिली होती आणि आता ती या नव्या नाटकातून रंगभूमीवर काम करताना दिसणार आहे.

या आधी अमृताने नृत्याच्या माध्यमातून स्टेजचा थरार अनेकदा अनुभवलाय मात्र नाटकातून प्रेक्षकांसोबत होणारा रोजचा संवाद तिच्यासाठी उत्कंठेचा विषय ठरणार आहे. पहिल्यांदाच व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करत असल्याने अमृता देखील या नाटकासाठी खूप उत्सुक असल्याचं कळतंय.

प्रसिद्ध लेखिका मधुगंधा कुलकर्णी यांनी लिहिलेल्या आणि अफलातून दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी दिग्दर्शित या नाटकातून अमृता रंगमंचावर नवी छटा सादर करून नव्या वर्षात प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाली आहे. ■ ■

### शुभ श्रावणी लवकरच झी मराठीवर



कुटुंबातील नात्यांची उब, मनातील न सांगितलेलं दुखः आणि हळुवार फुलत जाणारी प्रेमकथा यांचा मोहक संगम शुभ श्रावणी मालिकेच्या निमित्ताने प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे. या कथेत केंद्रस्थानी आहे श्रावणी राजेशिर्के, शिक्षणमंत्री विश्वंभर राजेशिर्के यांची मुलगी. चैतन्यमय, आनंदी आणि सगळ्यांना हसवत ठेवणारी श्रावणी आपल्या मनातील दुःख मात्र कुणासमोर व्यक्त करत नाही. भूतकाळातील काही कटू घटनांमुळे वडील विश्वंभर तिच्यापासून दुरावले आहेत, इतके की तिच्या सावलीलाही ते जवळ येऊ देत नाहीत.

वडिलांनी एकदाच का होईना, प्रेमाने जवळ घ्यावं—ही श्रावणीची आयुष्यभराची अपूर्ण इच्छा आहे. याच भावनिक संघर्षाचा साक्षीदार आहे शुभंकर शेलार, विश्वंभर यांचा अत्यंत जवळचा आणि विश्वासू सहकारी. सावलीसारखा श्रावणीच्या सोबत राहणारा शुभंकर तिच्या वेदना, तिचं एकटेपण, तिचं न सांगितलेलं दुःख जवळून पाहतो. सगळं समजून घेणारा, शांत, समंजस आणि प्रगल्भ शुभंकर तिच्या आयुष्यात अनाहूतपणे एक आधार बनत जातो. या मालिकेत प्रमुख भूमिकेत असणार आहेत वल्लरी विराज, सुमित पाटील आणि मराठी मनोरंजनविश्वातील ज्येष्ठ व प्रेक्षकांचे लाडके अभिनेते लोकेश गुप्ते. हि नवी मालिका शुभ श्रावणी लवकरच झी मराठीवर प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## संतनगरीत हजारो भाविकांची मांदियाळी

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि.१८ :
हिंदू संस्कृतीत मार्गशिर्ष महिना हा पवित्र व व्रत वैकल्याचा महिना समजला जातो. यातील गुरुवारला विशेष महत्व आहे. तसेच गुरुवार हा संत गजानन महाराज यांचा विशेष वार समजला जातो. यामुळे मार्गशिर्ष महिन्याच्या चौथ्या गुरुवारचे औचित्य साधून आज १८ डिसेंबर रोजी विदर्भ पंढरी शेगाव नगरीत आबालवृद्ध पाऊण लाख भाविकांची मंदियाळी जमली होती.

श्रीच्या समाधीचे हजारो भाविकांनी श्रींचे मनोभावे दर्शन घेतले. अनेक भाविक भक्तांनी श्रीच्या विजय ग्रंथाचे पारायण केले. श्रींच्या दर्शनासाठी राज्यभरातून हजारो भाविक संत नगरीत दाखल झाले होते. अनेक भाविक भक्त पहाटेपासून शहर सह तालुक्यातील आपआपल्या गावातुन पायदल वारी करत शेगावी दाखल झाले. श्रींच्या मंदिरात येऊन श्रींचे समाधी स्थळाचेचे मनोभावे दर्शन घेतले.



**पहाटे चार पासून रांगा**

भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता संस्थानकडून पहाटे ४ वाजता पासून श्रींच्या दर्शनासाठी मंदिर खुले ठेवण्यात आले. श्रीना गुरु मानणाऱ्या हजारो भाविकांनी श्रींच्या चरणी नतमस्तक होऊन मार्गशीर्ष महिन्यातल्या चौथ्या गुरुवारी श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला. अनेक भाविक शेकडो किलोमीटर अंतर पायी चालून श्रींच्या मंदिरात पोहोचले होते .

श्रींच्या समाधी दर्शनासाठी अडीच तास वेळ लागत तर श्रीमुख दर्शनासाठी २५ मिनिटे वेळ लागला.शेकडो भाविकांनी पारायण कक्षात मध्ये सहा ते सात तास बसून श्रींच्या श्री गजानन विजय ग्रंथाचे मनोभावे पारायण केले.

**लहुजी वस्ताद चौक रस्ता मोकळा ठेवावा**

श्री गजानन महाराज संस्थानच्या पार्किंग व्यवस्थेमध्ये आपली वाहने उभी करुन भाविक भक्त भक्तनिवास येथुन श्रींच्या मंदिराकडे जाण्यासाठी रस्ताने येतात. मात्र लहुजी वस्ताद चौकात लहान हातगाडीवर व्यवसायिकांनी आपआपली दुकाने लावली. तसेच चालक आपले ऑटो मध्यें उभे करतात. यामुळे मंदिरात जाता येत नसल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची अडचण होते.यामुळे अनेक भाविकांनी नगरपरिषद व पोलीस प्रशासन बद्दल नाराजी व्यक्त केली. तसेच लहुजी वस्ताद चौक रिकामा ठेवण्याची मागणी केली.

**४० हजार भाविकांना महाप्रसाद**

श्रींच्या दर्शनानंतर महाप्रसाद बारी मध्ये ४० हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिर परिसरात सर्वत्र भक्तिमय वातावरण होते. मंदिर परिसर भक्तांच्या, ह्लअनंत कोटी ब्रह्मांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रम्ह सच्चिदानंद फक्त प्रतिपालक शेगाव निवासी श्री संत गजानन महाराज की जय, अशा जयघोषाने दुमदुमून गेला.

## जिल्हाधिकारी कार्यालय उडवण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि.१८ :
अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात बॉम्ब ठेवल्याचा एक ई-मेल कार्यालयाला प्राप्त झाला. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली. सिटी कोतवालीसह विशेष पोलीस पथकाने जिल्हाधिकारी कार्यालय गाठून सखोल तपासणी केली.

यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय खाली करण्यात आले होते. या प्रकारामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात चांगलाच गोंधळ उडून दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर बॉम्बची अफवाच ठरल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

आज, गुरुवार कार्यालयीन कामकाजाचा दिवस असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयात कामकाजासाठी नागरिकांची चांगलीच गर्दी होती. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ई-मेलवर कार्यालयात बॉम्ब ठेवल्याच्या धमकीचा मेल प्राप्त झाला. हा ई-मेल येताच एकच खळबळ उडाली. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सिटी कोतवाली पोलिसांना माहिती देण्यात आली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह विशेष पथकाने जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेतली. श्वान व इतर पथकांना पाचारण केले होते. कार्यालयखाली करून सखोल तपासणी करण्यात आली.

## न्यायालयापेक्षा मोठे असल्याची सरकारची भूमिका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१८ :
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून खाते काढून घेतले आहे. तसेच सदनिका गैरव्यवहार प्रकरणी त्यांच्यावर अटकेच टांगती तलवार कायम असून शुक्रवारी यावर निर्णय होणार असल्याची माहिती आहे. यावर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया देत महायुती सरकारवर टीका केली आहे.



पत्रकारांशी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले, माणिकराव कोकाटेंच्या संदर्भातील सरकारची भूमिका कायद्याला धरून नाही. कायद्याला पायदळी तुडवण्याची त्यांची भूमिका आहे, संविधानाच्या विरोधी त्यांची भूमिका आहे आणि ही भूमिका म्हणजे आम्ही न्यायालयापेक्षा मोठे आहोत, कोणालाही जुमानत नाही आणि मन वाटेल ते वाटेल ते करू, अशी ती भूमिका असल्याचा टीका वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर केली आहे.




SPECTRUM